# माणूस

१३ सप्टेंबर १९६९
चाळीस पैसे





## प्रिय वाचकांची पत्रें

१३ सप्टेंबर १९६९

# माणूस

समग्र साप्ताहिक

वर्ष नववे : अंक पंधरावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी ५७३५९

किंमत ४० पैसे : वार्षिक वर्गणी वीस रुपये : परदेशाची वर्गणी चाळीस रुपये

## वावांची वाहवा !

९ ऑगस्ट 'माणूस' अंकातील 'छोटूबुवा गोखले' ह्यांच्या जीवनावरील लेख वाचन अनेकांनी समक्ष भेटून अथवा पत्राने लेख आवडल्याचे लेखक वा. वा. यांना कळविले आहे.

काही उल्लेखनीय अभिप्राय—

श्री. ना पेंडसे : एका कलावंताचे अस्वस्थ व्यक्तिमत्त्व तुमच्या लेखातून पाहावयास मिळाले.


प्रा. ना. सी. फडके : लेख फारच चांगला वाटला.

योगिनी जोगळेकर : जमलेल्या मैफलीप्रमाणे लेखही छान जमला आहे.

डॉ. ना. र. मारूलकर : कै. छोटूबुवा यांचा व माझा अगदी जवळचा संबंध होता...लेख मला फारच आवडला.

◻

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



# दिल्ली

## दिनांक २ सप्टेंबर

### सिंडिकेटचा ' शेवटचा खड्डा '

' हेचि फळ काय मम तपाला ' असे उद्गार काढण्याची वेळ काँग्रेस-एकीच्या बाबतीत यशवंत झालेल्या यशवंतरावांवर पुढे-मागे येणार हे ओळखायला कोणी ज्योतिषी नको होता. पण काँग्रेस-कार्यकारिणीच्या त्या बैठकीत चव्हाणांनी मोठ्या हिकमतीने घडवून आणलेली युद्ध-तहकुबी वाटली होती तितके दिवसही टिकणार नाही अशी स्पष्ट चिन्हे दिसत आहेत. सिंडिकेट चारी-मुंड्या चीत झाली असली तरी तिची पाचवी मुंडी म्हणजे स्वत: अप्पा अजूनही वाक्शरसंधान करीत आहेत. " मोरारजी-प्रश्न अजून मिटलेला नाही." ही त्यांची घोषणा व " विभूतिपूजेच्या वाढत्या प्रस्थापासून सावध रहा. " हा त्यांचा इशारा म्हणजे दुसऱ्या फेरीची ललकारी दिसते. इकड बाईदेखील नित्यनेमिक्रमाने रामप्रहरी जनता–जनार्दनाचे दर्शन घेत असतात व प्रवचन करीत असतात. अशा एका प्रवचनात त्यांनी प्रतिटोला हाणला की जे काही बदल होत आहेत ते काही मंडळींना नको आहेत, तेव्हा अशा मंडळींपासून सावधान !

एकंदरीत दंड थोपटले गेले आहेत, आता लढतीला तोंड लागायचे आहे ते येत्या ए. आय्. सी. सी. च्या अधिवेशनात. इंग्लंडच्या राजकीय प्रणालीप्रमाणे आपल्याकडेही पक्षाचा प्रमुख व सरकारचा प्रमुख एकच का नसावा हा प्रश्न या अधिवेशनात धसाला लागणार आहे इति किंवदंती. निदान पक्ष-प्रमुखाचे कार्यक्षेत्र कोणते व सरकारच्या प्रमुखाचे कोणते याचा आता सोक्षमोक्ष झालाच पाहिजे अशी इंदिराजींनी ठाम भूमिका घेतली आहे. प्रधानमंत्री या नात्याने आपल्याला असणाऱ्या अधिकारांवर शक्य तेवढ्या अधिक काँग्रेस–जनांकडून शिक्का–मोर्तब करून घेण्यासाठी काँग्रेसचे खास अधिवेशन भरविण्याचा इरादा त्यांच्या मनात घोळत असल्याचे म्हणतात.

दरम्यान अप्पांनी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक पुढच्या महिन्यात अहमदाबादला बोलावण्याचा घाट घातला आहे. पण बाई-पक्षीयांना ते नको आहे, कारण गुजराथ

कांग्रेसने एकमुखाने बाईंच्या विरुद्ध दिलेला कौल पाहता अहमदाबादला जाणे म्हणजे शत्रूच्या गोटात जाण्यासारखे आहे असे त्यांना वाटते. या महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात कार्यकारिणीची बैठक दिल्लीला होईल तेव्हा मोरारजी-मोक्षाचा प्रश्न उभा करण्याचा अप्पाजींचा विचार दिसतो. उलट बाईंनी निक्षून बजावले आहे की प्रधानमंत्री-पदाची बूज राखली गेलीच पाहिजे व कोणाला मंत्री म्हणून घ्यावे, कोणाला घेऊ नये हे ठरविण्याचा अधिकार सर्वस्वी प्रधानमंत्र्याचाच असला पाहिजे. मोरारजी-प्रकरणी आपण निर्णय बदलणे शक्य नाही असेही त्यांनी काही कांग्रेसश्रेष्ठी त्या निमित्ताने भेटायला गेले असता त्यांना सांगितल्याची वार्ता आहे.

अशा रीतीने एकीकडे इंदिराजी विजेत्याची खंबीरता दाखवीत आहेत तर दुसरीकडे सिंडिकेटचा अधिकच फज्जा उडत चालला आहे. फटफजितीचे पहिले कारण म्हणजे सदोबा पाटील. एके काळी इंदिराजींना ' धडा शिकविण्या'च्या गोष्टी करणारे पाटील ऐन वेळी बारगळले असा कामराज व मोरारजींनी त्यांच्यावर आरोप केला. उलट येथल्या पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीत सदोबांनी हा आरोप झिडकारून असे आश्चर्योद्गार काढले की " वास्तविक मीच एकट्याने सिंहासारखी गर्जना केली." रागाच्या भरात सदोबांनी आपल्या सिंडिकेट-सवगड्यांवर आणखीही बरेच तोंडसुख घेतले– " मी नेभळा ठरलो असे हे लोक म्हणतात, मग मोरारजी व कामराज कणखर का राहिले नाहीत ? मी काही सिंडिकेटचा प्रमुख नाही. त्यांनी कणखरपणा दाखविला असता तर मी त्यांचे अनुकरण केले असते. मोरारजी अन् कामराज बैठक सोडून निघाले असते तर मीही त्यांच्या मागोमाग बाहेर पडलो असतो. मी मुंबईला ' पळून ' गेलो असे कामराज म्हणतात. पण मी अप्पांना फोन करून कळविले होते, व स्वतः अप्पांनीच "आता काही करणे शक्य नाही" असे म्हटले होते. भांडायचेच म्हटले तर कोणी काय उद्योग केले याचा तपशील मी सांगू शकेन." इत्यादि इत्यादि वगैरे वगैरे !

सिंडिकेटच्या फजितीचा दुसरा पुरावा म्हणजे लढाईला जाताना ही मंडळी इंदिराजी व इतर दोघा-चौघांना सस्पेंड करणारा ठराव अक्षरशः खिशात घेऊन गेली होती. – म्हणजे करायला गेले एक अन् झाले भलतेच. हा ठराव आधी तयार असल्याचा गौप्यस्फोट सदोबांनी नुकताच मुंबईला केला पण त्या आधीच राजधानीत हे बेंड फुटले होते.

सिंडिकेटच्या फजितीचा कडेलोट म्हणजे ज्या तिलोत्तमेमुळे ही सर्व सुंदोपसुंदी झाला तीच म्हणजे स्वतः रेड्डीच सिंडिकेटवर उलटले आहेत व त्यांनी ' दळभद्री सिंडिकेट ' अशी शिवी हासडली आहे. " खरे म्हणजे इंदिराजींनीच गेल्या मे महिन्यात राष्ट्रपतिपदासाठी आपले नाव सुचविले होते, पण परिस्थितीचे फासे उलटे पडल्याने आपण सिंडिकेटच्या जाळ्यात अडकलो, " असे त्यांनी स्पष्टीकरण केले आहे. थोडक्यात म्हणजे सिंडिकेट अक्षरशः नामोहरम झाली आहे. येत्या

एक-दोन महिन्यात ती 'शेवटच्या खड्डया'चा लढा देणार आहे खरी, पण त्या खड्डयातच तिचे दफन होते की काय पहायचे.

## काथ्याकुटीचा काळ

विविध विरोधी पक्षांची मंडळीही गेल्या काही दिवसात दिल्लीला जमून नुकत्याच घडलेल्या घटनांचा व त्यातून निघणाऱ्या परिस्थितीचा काथ्याकूट करण्यात गुंतली आहेत. नेहमी विभक्त असणाऱ्या संयुक्त समाजवाद्यांनी 'लोक हो, काँग्रेसच्या विरुद्ध एकजूट करा,' असा आदेश द्यायला कधी केलेले नाही. संसोपा अध्यक्ष कर्पूरी ठाकूर यांनी एका पत्रकार-परिषदेत "आमच्या एकीची बेकी झालेली नाही." असे पटविण्याचा बराच प्रयत्न केला. कर्पूरीबाबू व एसेम् एका बाजूला अन् मधू, जॉर्ज, राजनारायण व रामसेवक यादव एका बाजूला अशी या नेत्यांच्या पक्षाच्या नेत्यात फूट पडली आहे, हे साफ खोटे आहे असा त्यांनी निर्वाळा दिला. बरं अनुयायांचे काय ? पक्षाने पार्लमेंटमध्ये सरकारविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणून हात दाखवून अवलक्षण करून घेतले, त्यावेळी पक्षाचे बरेच पार्लमेंट-सदस्य गायब होते हे कसे ? उत्तर नाही. मंडळींनी बँक राष्ट्रीयीकरणावर पास केलेल्या ठरावात म्हटले की कार्यवाही बरोबर, पण तिचा हेतू चूक आहे, कारण तो तात्त्विक नसून सत्ता टिकविण्याचा आहे. गिरींच्या निवडणुकीने काँग्रेसची दोन शकले पडतील अशी आम्हाला आशा होती, पण त्यावेळीही सत्तेला चिकटून राहण्याच्या उद्देशाने काँग्रेसवाल्यांनी आपसातली फूट मिटविली असा कर्पूरीबाबूंनी शोक केला.

स्वतंत्र मंडळींनी आपल्या खलबतात असा निष्कर्ष काढला आहे की रेड्डींचा पराभव भारतीय क्रांतिदलामुळे झाला. मात्र काही स्वतंत्र 'जनसंघी मंडळीं'ची

**पुरंदऱ्यांची दौलत**

श्रीमंत बाजीराव पेशवे / तुळशीबागवाला / खासा फिरंगी मारिला / जिद्द / खासगीवाला / खंडेराव दरेकर / तलवारीचे पाते / पालखी / पुरंदऱ्यांची दौलत

नऊ पेशवेकालीन कथा

ब. मो. पुरंदरे

किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

सेकंड प्रेफरन्स मते रेड्डींच्या ऐवजी गिरींना गेली त्यामुळेही घोटाळा झाला असा कबुलीजबाब देण्यात आला आहे. एका पत्रकात स्वतंत्र म्हणतात समाजवादी व साम्यवादी पक्ष प्रधानमंत्र्यांचे उपग्रह झाले आहेत, पण आम्ही आमचा 'स्वतंत्र' बाणा सोडणार नाही. स्वतंत्रांच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने केलेल्या ठरावात सांगण्या-सारखा एक ठराव म्हणजे देशांतल्या काही महत्त्वाच्या जागी साम्यवादी व 'सह-प्रवासी' मंडळी अधिकाधिक शिरकाव करीत आहेत याबद्दल काळजी व्यक्त करण्यात आली. उदाहरण म्हणून बंगालचे नवीन राज्यपाल धावन व इंडियन एअरलाइन्सचे नवीन प्रमुख कुमारमंगलम् यांच्याकडे बोट दाखविण्यात आले.

जनसंघाच्या कार्यकारिणीची बैठक झाली तिच्यात पक्षाने म्हटले की स्वतंत्रां-प्रमाणे आमचा बँक-राष्ट्रीयीकरणाला तत्त्वतः विरोध नाही, पण या प्रकरणी इतकी उतावीळ करण्यात आली की त्यात आर्थिक सद्हेतु नसून इंदिराजींचा आंतरःकोपि राजकीय हेतु होता हे सिद्ध झाले आहे. राजकीय काय किंवा आर्थिक काय, सत्तेचे केंद्रीकरण नाहीतरी वाईटच, पण आता हे राष्ट्रीयीकरण तरी यशस्वी करा असे म्हणून जनसंघाने त्यासाठी काही तपशीलवार 'मूलभूत' सूचनाही केल्या आहेत. सांप्रतच्या एकूण राजकीय परिस्थितीचे आपले निदान आता स्वतंत्रांना अधिका-धिक पटू लागले आहे अशी ग्वाही देऊन एका ठरावात म्हटले आहे की 'आर्थिक उजवेपणा'चा सदैव पुरस्कार करणाऱ्या स्वतंत्र पक्षालाही आता उमजले आहे की आगामी संघर्ष डाव्या – उजव्यांत व्हायचा नसून राष्ट्रवादी अन् राष्ट्रद्रोही यांच्यात व्हायचा आहे. तरीदेखील स्वतंत्र किंवा इतर राष्ट्रीय व लोकशाहीवादी पक्षांबरोबर सबगोलंकार करून कॉंग्रेस-विरोधी व साम्यवाद-विरोधी संयुक्त आघाडी उघडण्याची कल्पना आपल्याला मंजूर नाही अशी जनसंघाने घोषणा केली आहे. – म्हणजे हे एक भिजत घोंगडे वाळत पडले म्हणायचे. एखाद्या विशिष्ट बाबतीत 'संगनमत' करता येईल पण विलीनीकरण शक्य नाही.

## मंत्री पाहिजेत

रेड्डी प्रकरण शिजू लागल्यापासून इतकेच नव्हे तर मोरारजींना अर्धचन्द्र मिळाल्या-पासून आणखी काही मंत्र्यांनाही जागा खाली करावी लागणार असल्याच्या वावड्या दिल्लीत उडत होत्या; परंतु येत्या काही दिवसात खरोखरीच काही मंत्रालयांची खांदेपालट होणार असल्याचे कळते. पूर्वी इंदिराजी अर्थखाते लवकर हातचे सोडणार नाहीत अशी वदंता होती, तर आता त्या ते लवकरच कोणाला तरी बहाल करणार आहेत अशी वदंता आहे. या प्रकरणी भूतपूर्व अन्नमंत्री सुब्रह्मण्यम् यांचे नाव ऐकू येते. अर्थात् त्यांना मंत्री केले तर सहा महिन्यात त्यांना एखादी निवडणूक जिंकून पार्लमेंट-सदस्य व्हावे लागेल. शिवाय एक-दोन राज्यपालांच्या जागाही भरावयाच्या आहेत. तेव्हा काही मंत्र्यांची 'वर हकालपट्टी' झाली तर नवल नाही.

– अनामिक

# प्रिय वाचकांची पत्रे

**१८ ऑगस्ट**

□ १५ ऑगस्ट 'माणूस'चा विशेषांक फार उत्कंठा ताणून १५ तारखेला मिळाला. या अंकाची किमत दोन रुपये होती. त्यामुळे अंकाबद्दल फार मोठ्या अपेक्षाही होत्या. पण अंक वाचून निराशाच पदरी पडली. किमतीच्या मानाने अंक निकृष्ट दर्जाचा वाटला.

— मनोहर पटवर्धन, ना. सी. नातू, मा. के. जठार, दौ. वि. ठाकुर, मुंबई ८

□ आपला विशेष गाजावाजा केलेला 'स्वातंत्र्यदिन अंक' आजच घेतला व एकाच बैठकीत त्याचे वाचन पुरे केले. चंद्रशेखर यांच्या लेखामुळे अंकाची खोली बरीच वाढली आहे. मात्र या अंकाची किमत पाहता हा 'माणूस' नावाचा 'राक्षस' वाटतो याची नोंद घ्यावी, ही विनंती.

—नारायण अनंत गोखले, मुंबई

**२० ऑगस्ट**

□ या अंकातील रशियन प्रवाशाची 'डायरी' अत्युत्तम; पण या अंकात ती नको होती. भारतदर्शन, १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहास, तरुणातील स्वातंत्र्यतळमळ वगैरे खरे असले तरी हप्त्याने डायरी आली असती तरी हरकत नव्हती.

'दिल्ली दिनांक'ची भाषा शैलीयुक्त व तयार वाटते.

— श्री. भास्कर दोडे, सौ. उषाताई दोडे, नासिक

□ १५ ऑगस्टचा विशेषांक वाचला. तुम्हांला वाटेल रानडयांचा लेख त्यात होता म्हणून हे पत्र. तसं नाही. आपले संपादकीय व विशेषतः प्राप्तीकर न देण्याची कल्पना मला फार आवडली. माझ्या धायकुती स्वभावाप्रमाणे माजगावकरांनी 'Waldeh' वाचलेले दिसते किंवा थोरोचे इतर साहित्य वाचलेले दिसते असे मी ठरविले देखील अन् पुढच्याच परिच्छेदात समजूत पटली.

गतवर्षात आम्हांला English literatore M. A. साठी American Literature चा एक पेपर होता. थोरोचे 'Waldeh' आमच्या विभागप्रमुखांचे अतिशय आवडते पुस्तक. स्वतःला 'Walled in' करून ते चिंतन करून आम्हांला शिकवीत. गांधी शताब्दीनिमित्ताने थोरो व गांधी ह्यांच्या विचारप्रदर्शनावर एखादा लेख लिहावा अशी त्यांची इच्छा होती. तेव्हा जमले नाही. आता बघेन. गांधींचा प्रतिकार परकीय सत्तेविरुद्ध होता. थोरोचा मध्यमवर्गाच्या विचारसरणीतून डोकावणाऱ्या गुलामगिरीविरुद्ध होता. मला थोरो जास्त आवडला व म्हणून आपला निर्णय.

— सौ. रानडे, औरंगाबाद

**२१ ऑगस्ट**

□ १५ ऑगस्टचा माणूस अंक आल्यावर 'आकाशवाणी'चा अंक येऊन पडल्याचा

भास झाला. मुखपृष्ठ सुंदर आहे, परंतु नेहमीचा सुंदर गेट अप नव्हता. 'पुण्य-स्मरण'बद्दल श्री. वसंत पोतदार अभिनंदनास पात्र आहेत. श्री. जैन, श्री. मिरासदार साधारण.

—अशोक गोखले, पुसद

२२ ऑगस्ट

□ माणूसच्या स्वातंत्र्यदिन विशेषांकातील आपला अग्रलेख वाचला, कळला आणि पटला. आपण अवलंबिणार असलेला वैयक्तिक असहकाराचा पर्याय खरोखर स्तुत्य आहे; पण असा असहकार स्वतंत्र व्यवसायी लोकांपुरताच मर्यादित आहे. पण माझ्यासारख्या (व्यवसायापुरता) परावलंबी असलेल्या तरुणांना हा पर्याय अगदीच अशक्य आहे.

—वामन शेणॉय, कल्याण.

२४ ऑगस्ट

□ हा अंक मला त्यातील अनेक विचार-प्रवर्तक लेखांमुळे फार आवडला. 'विद्यार्थी असे का वागले?' हा श्री. वि. शं. पारगावकर यांचा लेख तर विशेष विचार प्रवृत्त करणारा आहे. प्राथमिक स्तरापासून उच्च शिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत सर्वच विद्यार्जन करणाऱ्या नव्या पिढीचा विचार अशा वस्तुनिष्ठ भूमिकेवरून होणे फलदायी ठरेल असे वाटते.

— वि. म. कुळकर्णी, सोलापूर

२५ ऑगस्ट

द. मा. मिरासदारांची 'खादीची कवच-कुंडले' उत्तम! वसंत पोतदारांचा चंद्रशेखर आझाद यांच्यावरील लेखही उत्तम आहे. एक कळकळीची सूचना अशी की, 'गंगाजमनी व्यक्तिमत्त्व' असलेल्या श्री. चंद्रशेखर यांच्या 'हातातील कड्याने बीअरची बाटली फोडणाऱ्या सरदारजीच्या' व तत्सम रटाळ लिखाणाला 'माणूस'सारख्या साप्ताहिकात प्रसिद्धी देऊ नये. 'ग्यानबा'ची अनुपस्थिती विशेष जाणवते.

— हरीश गोपालजी ठक्कर

२७ ऑगस्ट

अंक आतुरतेने घेतला, पण वरील दोन रुपये किंमत व आतील मजकूर पाहून अत्यंत घोर निराशा झाली.

—वासुदेव संत, मुंबई

प्राप्तिकर भरण्याबाबत तुम्ही असहकार करून सरकारच्या माथी काही मारू शकणार नाही PL–480 प्रकरण थांबवायला एकतर आपण सत्ताधारी व्हायला हवे किंवा जनतेला...

PL–480 मुळे होत असलेल्या नामुष्कीची ओळख करून द्यायला हवी—आणि स्वावलंबन कसे साधता येईल, याचे सरळ सोपे मार्गदर्शन हवे.

काँग्रेसच्या सत्ताधाऱ्यांना 'सत्ता' हेच आकर्षण आहे. 'चीड' हा त्यांच्या दृष्टीने दुर्गुण!

१० टक्के धान्य तुटवड्यासाठी एवढी सरकारी PL–480 ची यातायात! महिन्यातून फक्त ३ दिवस! Dietany Habits बदलण्यास लोकांस प्रवृत्त करणे हा महत्त्वाचा व सोपा मार्ग आहे. बटाटे, साबूदाणा, वरी सहज चालेल. यासाठी 'PL–480' मुळे झालेल्या हानीचे ८ पानी 'कटुसत्य' आणि त्यावर उपाय

म्हणून ' जेवणातील बदलाने PL-480 वंद ' करणे कसे शक्य आहे याबद्दल ८ पाने अशी १६ पानी ४ आणेवाली पुस्तिका तयार करावी. प्राथमिक शाळा माध्यमिक शाळा, कॉलेजे व तालुका पंचायत समित्या यांमार्फत प्रसार करणे शक्य आहे. सरकारी साहाय्याची अपेक्षा न ठेवता होऊ शकेल-कदाचित सरकारला हे काम आवडेल.

PL-480 मुळे येणाऱ्या लाचारीला लाथ मारून आपण स्वातंत्र्य उपभोगिले पाहिजे असे आवाहन असावे.

PL-480 चा Buffer Stock नसल्यास काय होईल ? धान्य भाव वाढतील हे उघड आहे. त्यासाठी जनतेकडून धान्याची मागणी कमी कशी होईल हे पाहिले पाहिजे. स्व. शास्त्रीजींनी सुचविल्याप्रमाणे, " आठवड्यातून एक दिवस धान्याशिवाय " हा मंत्र पुरेसा आहे.

प्राप्तीकर न देण्याचा तुमचा असहकार PL-480 थांबविण्यास उपयोगी पडणार नाही. काहीतरी व्यवहारिक योजना मनात आणायला हवी.

— श्रीकांत सबनीस, नारायणगाव

## २८ ऑगस्ट

¤ स्वातंत्र्यदिन विशेषांक आवडला. मुखपृष्ठापासूनच बोलका व मार्मिक माणूस जाणवला. पोतदारांचा ' चन्द्रशेखर आझाद ' विलक्षण काव्यमय व मनाची पकड घेणारा. पोतदारांचे अभिनंदन ! मिरासदारांचा ' कर्ण, व खादीची कवचकुंडले ' हा खास राजकीय छाप्यांचा चुरचुरीत मसाला मनसोक्त छूटला. ' आस्वाद'कडे पाहून ' माणूस'ने मध्यंतरीप्रमाणे काव्य वाळीत न टाकल्याचे समाधान लाभले. आनन्द घाटुगडे यांच्या कविता आवडल्या. अंक एकंदरीत उत्तम. फक्त संपादकीय विचारांशी काही बाबतीत मतभिन्नता व ती देखील नोंदवण्याइतकी. संपादकांचे बहुतेक विचार पटतात पण सविनय कायदेभंगापासून स्फूर्ती घेऊन इन्कमटॅक्स न भरण्याचा आपला निर्णय व्यवहार्य वाटला नाही. कायद्याने पण तो टिकणार नाही; याउलट सरकारची कोणतीही जाहिरात न छापण्याचा (पदराला खार लागणारा) निर्णय अधिक वास्तव ठरला असता. एरव्ही कोणत्याही कारणास्तव कर चुकविणाऱ्यांचा पैसा काळा पैसा ठरतो, मग आपला निर्णय बाधक ठरल्याशिवाय कसा राहील ? फक्त प्रांजल प्रतिक्रिया नोंदवली.

एक मात्र खरे की, अभिनव कल्पना व उपक्रमशीलतेबाबत ' माणूस ' बरोबर स्पर्धा करणारे साप्ताहिक आज तरी माझ्या वाचनात नाही.

— यशवंत भिमाले, पुणे

## २९ ऑगस्ट

¤ संपादकीय वाचताना मला सानेगुरुजींच्या प्रणालीची आठवण झाली. बाहेरच्या देशाचे कर्ज घेऊन, अमेरिका आदी देशांनी आपला विकास करून घेतला. तसेच जपानने दुसऱ्या महायुद्धानंतर ! पण आपण भरमसाट पैसा आणूनही त्याचा तितकासा उपयोग झाला नाही. ह्याचे कारण आपल्या देशात सामान्य माणसापासून तो थोरामोठ्यांपर्यंत देशभक्तीचा अभाव आहे.

परिणाम पैसा खाल्ला गेला व अनाठायी वाया गेला. दुसरे कारण नियोजन करताना चूक झाली. मोठ्या उद्योगधंद्यांच्या मागे लागलो. त्यामुळे बेकारीचा प्रश्न 'आ' वासून उभा आहे. एका माणसाने प्राप्तीकर न देऊन हा प्रश्न कसा सुटेल? करबंदी वा चळवळ म. गांधींना व पटेलांना फारच थोड्या विभागात थोडा वेळ यशस्वी करता आली. सबब आपले मार्गदर्शन हे अशास्त्रीय आहे.

—के. गो. जोध, अमरावती

◻ आपली अभिनव स्पर्धा प्रथमदर्शनी क्लिष्ट वाटते; परंतु बारकाईने पाहिल्यानंतर त्याची गोडी लक्षात येते. माझ्या अन्य सहकाऱ्यांना व मित्रांना ह्या स्पर्धेत भाग घेण्याविषयी सांगितले आहे. मला असे वाटते की, 'गाण्यावरून, स्मितावरून, सिगारेट पिण्याच्या पद्धतीवरून नटनटी ओळखा' अशा धर्तीच्या ज्या स्पर्धांचे पीक उगवत आहे त्या स्पर्धांकडून मराठी तरुण वाचक अन्य बौद्धिक (आणि धनलाभ देणाऱ्या) स्पर्धांकडे वळावा ही सुप्त इच्छा असावी. आपले विशेषांक नेहमीच दर्जेदार असतात. श्री. चंद्रशेखर यांची शैली अफलातून आहे. सूचकता हा साहित्यगुणही आढळून येतो. या विशेषांकात डॉ. वि. म. दांडेकरांचा लेख का नाही? [नाहीतरी हल्ली त्यांची 'माणूस'-मधील अनुपस्थिती जाणवतेच.] दादूमियांच्या लेखणीचा मी एक चाहताच आहे. त्यांचा लेख विस्तृत असला तरी विचार करण्याजोगा आणि वाचनीयसुद्धा आहे. 'इवात' दैनंदिनीत पाल्हाळ जाणवला. एकूण अंक पसंत पडला. परंतु क्वचित् असे वाटते की साप्ताहिकाच्या तुलतेने 'माणूस'च्या विशेषांकाची किंमत (Value नव्हे) जास्त वाटते. विशेषतः, रोखीने घेणाऱ्याला! (तरीसुद्धा विकला जातो हे मान्य).

आपल्या संपादकीयाशी जुळणारे व्यंगचित्र (यथार्थ चित्र) काढणाऱ्या श्री. शि. द. फडणीसांना धन्यवाद.

—चं. र. राजे

३१ ऑगस्ट

◻ 'माणूस' साप्ताहिकालाच सर्व मराठी साप्ताहिकात विशिष्ट स्थान प्राप्त झाले आहे. म्हणूनच अंक फारच उत्तम आहे याबद्दल वाद नसावा. अंकातील सर्वच लेख सुंदर आहेत.

चंद्रशेखरांनी श्री. यशवंतराव चव्हाणांचे वर्णिलेले चित्र फारच मार्मिक आहे. दादुमियांचा तेलंगणवरील अभ्यासपूर्ण लेख फार आवडला. श्री. बाबासाहेब पुरंदऱ्यांनी लिहिलेली गोष्ट जरा शिळीच वाटली. मराठ्यांच्या इतिहासात अजूनपर्यंत अंधारात असलेल्या असंख्य व्यक्ती आहेत. त्यांना प्रकाशात आणण्याचा प्रयत्न मा. बाबासाहेबांनी करावा अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे.

श्री. माजगावकरांनी योजलेला 'असहकार' मात्र तेवढा पटला नाही.

—श्रीपाद वि. जोशी, मुंबई

◻ 'सिंधुपुत्रांनो! चला' ह्या आपल्या लेखाने हृदयाचा ठाव घेतला आहे. अतिशयच आवडले. आपल्या साप्ताहिकातून दरवेळेस एखादी सत्य हेरकथा आणि श्री. ब. मो. पुरंदरे ह्यांचे एखादे

ऐतिहासिक टिपण दिल्यास ते निश्चितच आवडेल. ' माणूस 'चा आकार आणखी मोठा असावा असे सतत वाटते.

—के. एस्. देशमुख, वसमतनगर

**१ सप्टेंबर**

¤ युवक वाचकांच्या विचारांना चालना मिळावी म्हणून जी स्पर्धा आयोजित केलेली आहे तीत भाग घेऊन, युवक आदर्शपणाचा मार्ग स्वीकारून पहिले बक्षीस मिळवतीलही. प्रत्यक्षात तसे करणे शक्य होईल का ? युवकांनी श्रद्धा ठेवावी अशी व्यक्ती ज्याप्रमाणे आढळू शकत नाही त्याप्रमाणेच; नीट मार्गदर्शन होईल असे एकही मासिक, साप्ताहिक आपल्या महाराष्ट्रात नाही असेच खेदाने म्हणावे लागते. सर्व लिखाण एकांगी असते. सारासार विचार नसतोच.

आपणच अग्रलेखात लिहिता ' मी प्राप्तीकर यापुढे भरणार नाही; कारण माझा शासनाशी संबंध येतो कुठे ?' हे आपले लिहिणे सर्वस्वी चूक आहे. तुम्ही या समाजाचे, शासनाचे घटकच आहात ना ? हे चूक, ते वाईट अशा कटकटी लावू नका. सुदैवाने तुमच्याकडे वृत्तपत्र आहे, युवकांची संघटना आहे. प्राप्तीकर भरता तेव्हा पैसाही आहे. तेव्हा प्रत्येक दोषाचे खापर शासनाच्या माथी न फोडता आपण एखादी कल्पना,लहानशीच का होईना,मूर्त स्वरूपात करून दाखवावी. अशा प्रयत्नात मी जरूर सहकार्य देईन.

—सौ. विजयालक्ष्मी पडित, मुंबई

**२ सप्टेंबर**

¤ स्वातत्र्यदिनी केलेले चंद्रशेखर आझाद यांचे ' पुण्यस्मरण ' अत्यंत समर्पक वाटले. चंद्रशेखरांचे ' दिल्ली दिनांक ' हे राजकीय बातमीपत्र अत्यंत विचारक्ष वाटते. आपल्या सप्ताहिकात ललित साहित्याची दालने यापेक्षा आकर्षक झाली तर ? नव्हे, तो व्हावीत ही अपेक्षा. आपल्या साप्ताहिकातून देशातील तरुणांचा स्वच्छ व पूर्वग्रहदोषविरहीत राजकीय दृष्टीकोण तयार करण्याचे अमोल कार्य होत आहे याबद्दल अभिनंदन.

—बाळ सापटणेकर, अक्कलकोट

¤ आमच्या कर्जतला जवळजवळ शंभर अंक येतात व खपतात. आपला साप्ताहिक ' माणूस ' समग्र वाचला जातो. स्वातत्र्यदिन विशेषांकाचे मुखपृष्ठ विचार करावयास लावते. संपादकीय स्वाभिमान उफाळून आला आहे. हे परावलंबित्व कोठवर सोसायचे ? आजच्या बदलत्या मूल्यांच्या काळात वैयक्तिक सत्याग्रह कितपत योग्य वा अयोग्य हे आपणच ठरवू शकता. त्याचा परिणाम जनतेवर पर्यायाने सरकारवर—कितपत हाईल ? एक गोष्ट सर्वच कबूल करतात की ' माणूस ' म्हणतो ते बरोबर आहे.
अंकाची किंमत जास्त वाटते.

—बा. पां. रेडेकर, कर्जत

¤ या अंकातील चंद्रशेखरांचे दिल्ली दिनांक हे वार्तापत्र अफलातून आहे. त्यांच्या चमत्कारितेवर आपण खूष आहोत. निशिकांत मिरजकर यांचे परीक्षणही आवडले.

दादुमियांचा लेख, विशेषत: पूर्वार्ध मात्र काही चुकीच्या समजुतीवर आधारलेला वाटला.

—यशवंत कानिटकर, मुंबई

¤ ¤ ¤

# दादूमियांची काही चूक माहिती

नरहर कुरुंदकर.

'माणूस'च्या यंदाच्या स्वातंत्र्यदिन-विशेषांकात स्वतंत्र तेलंगणच्या चळवळी-विषयी दादूमिया यांचा एक प्रदीर्घ लेख आहे. त्या लेखाची मांडणी व शैली चवतृत्वपूर्ण आणि रसाळ अशी आहे. मात्र त्यातील काही विधाने चुकीची असल्यामुळे त्यांबाबत दुरुस्ती करणे आवश्यक झाले आहे. दादूमिया हे हैदराबाद संस्थानच्या जुन्या राजकारणाशी फारसे परिचित दिसत नाहीत. मी स्वत: हैदराबाद संस्थानचा रहिवासी, हैदराबादच्या मुक्ति—आंदोलतात भाग घेतलेला एक विद्यार्थी आणि संस्थानातील बहुतेक सर्व जुन्या मोठ्या नेत्यांना बरेच जवळून ओळखणारा, असा एक माणूस आहे. माझ्यापेक्षा अधिकारवाणीने याबाबत खुलासा करणारी माणसे मराठवाड्यात पुष्कळच आहेत. अजून पूज्य स्वामीजी हयात आहेत; पण 'माणूस'-मधील लिखाणाकडे ही ज्येष्ठ निवृत्त मंडळी देणार नाहीत व मराठी वाचक उगीचच काही गैरसमज मनात ठेवून बसेल. ऐतिहासिक सत्य माहीत असावे. या दृष्टीने काही माहिती मी येथे नोंदवू इच्छितो.

जुन्या हैदराबाद संस्थानात मराठी भाषिक मराठवाडा, कानडी भाषिक कर्नाटक आणि तेलगू भाषिक तेलंगण असे तीन विभाग होते. एकूण हैदराबाद संस्थानचे सोळा जिल्हे. त्यांपैकी स्थूलपणे आठ तेलगू भाषिक, पाच मराठी भाषिक आणि तीन कानडी भाषिक, असे या संस्थानाचे स्वरूप होते. हैदराबाद संस्थानातील बहुतेक सर्व मोठे नेते हैदराबाद शहरी राहत असल्यामुळे व त्यांत महाराष्ट्रीय नेत्यांचा भरणा अधिक असल्यामुळे पुष्कळ वेळा हैदराबादची माहिती देताना बाहेरील माणसांचा घोटाळा होतो. उदा० गोपाळराव एकबोटे, काशीनाथराव वैद्य ही माणसे महाराष्ट्रीय; पण हे तेलगू भाषिकांचे नेते, त्यांचे हित पाहणारी, ते हित प्रधान मानणारी, हे विसरू नये.

पूज्य स्वामी रामानंद तीर्थ हे हैदराबादच्या स्वातंत्र्य—आंदोलनाचे नेते. सर्व मराठवाडा त्यांना आपले म्हणून ओळखतो. पण सर्व तेलंगण स्वामीजींना आपले स्वत:चे मानतो. आज राजकारणातून निवृत्त झाल्यानंतर स्वामीजींनी आपले कायम निवासस्थान तेलगू प्रदेशात निवडलेले आहे. हे गृहस्थ पूर्वाश्रमीचे श्री. व्यंकटराव खेडगीकर या नावाचे. आताच्या आश्रमात पूज्य स्वामी रामानंद तीर्थ. हैदराबाद संस्थानात त्यांचा उल्लेख 'स्वामीजी' या लाडक्या नावाने होतो. स्वामीजी कानडी आहेत. हैदराबाद मुक्ति-आंदोलनाचा लढा या कानडी माणसाच्या नेतृत्वाखाली लढला गेला.

हैदराबाद मुक्ती आंदोलनात भूमिगत कार्य आणि सशस्त्र प्रतिकार यांवर फार भर होता. हे कार्य करण्यासाठी स्टेट-कॉंग्रेसने जी कृति-समिती नेमली तिचे अध्यक्ष श्री. दिगंबरराव बिंदू होते. बिंदू आरंभापासून शेवटपर्यंत कम्युनिस्टविरोधी, हैदराबाद राज्यातील जहाल व मवाळ या दोघांच्याही विश्वासाला पात्र व हैदराबाद-मध्ये सत्तारूढ झालेल्या पहिल्या लोकशाही सरकारातील तेलगू बहुसंख्याक प्रांतात असणारे महाराष्ट्रीय गृहमंत्री होते. शक्य त्या सर्व उपायांनी कम्युनिस्टांचा नायनाट करण्यास बिंदूंनी कधी मागेपुढे पाहिले नाही. मंत्रिमंडळातून मुक्त झाल्यानंतर श्री. बिंदू सध्या खादी-कार्य करीत असतात. हे गृहस्थ हैदराबादच्या सशस्त्र आंदोलन-समितीचे म्हणजे कृति-समितीचे अध्यक्ष होते. कृति-समितीवर अजून चार सदस्य होते. पैकी जी. के. प्राणेशाचार्य आणि डॉ. मेलकोटे हे दोन कानडी व एम्. नरसिंग-राव हे तेलगू गृहस्थ होते. कृति-समितीच्या एकूण पाच सदस्यांपैकी हे चार सदस्य कडवे कम्युनिस्टविरोधी याच स्वरूपात आंदोलनपूर्व काळी, आंदोलन काळी व आंदोलनोत्तर गेली वीस वर्षे जनतेसमोर आहेत. हे चारहीजण कम्युनिस्ट तर नव्हतेच; पण मार्क्सवादीसुद्धा नव्हते. कम्युनिस्ट म्हणून ज्यांच्या नावाचा रोज बभ्रा केला जातो ते आमचे वंदनीय नेते भाई गोविंदराव श्रॉफ या कृति-समितीचे सरचिटणीस, कुशल संघटक, तरुणांचे लाडके नेते हे मात्र कडवे मार्क्सवादी होते. आजही हे गृहस्थ मार्क्सवादीच आहेत. हैदराबाद मुक्ति-आंदोलनात हजारो तेलगू सत्याग्रह्यांनी भाग घेतला, शेकडो तरुण नेते या आंदोलनातून उदयाला आले. आजच्या आंध्र प्रदेशातील एक मंत्री पी. व्ही. नरसिंहराव हे अशा मंडळींपैकी एक आहेत.

यावरून हैदराबादची चळवळ सशस्त्र असली तरी कम्युनिस्टांची नव्हती, कम्युनिस्ट नेतृत्वाखाली नव्हती व केवळ मराठी भाषिकांची नव्हती, हे उघड होईल. या चळवळीला संस्थानाबाहेरून आजचे कॉंग्रेसचे अध्यक्ष निजलिंगप्पा आणि मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री द्वारकाप्रसाद मिश्रा यांनी फार मोठी मदत केली. हे दोघेही मदतनीस त्या काळात सरदारवादी व कम्युनिस्टविरोधक म्हणून ओळखले जात. आजही दोघे कम्युनिस्टविरोधकच आहेत. फक्त मिश्राजी सिंडिकेट सोडून १९५४ सालानंतर नेहरू-गटात गेलेले आहेत.

हैदराबाद संस्थानात पोलीस-ॲक्शन सप्टेंबर १९४८ साली झाली. त्यानंतर एक वर्षाने चार मंत्री मंत्रिमंडळात गेले. या चारांत दोन तेलगू होते. ते म्हणजे बी. रामकृष्णराव व व्ही. बी. राजू. एक कानडी होता–डॉ. मेलकोटे, एक महाराष्ट्रीय–फुलचंदजी गांधी. ही चार नावे मनाचे कल व संघटना यांबाबत पूर्ण तपासणी करून कडवी कम्युनिस्टविरोधी म्हणून सरदार पटेलांनी मान्य केलेली होती. या चारांपैकी तीन सशस्त्र आंदोलनाचे नेते होते आणि एकाने आंदोलन सुरू होताच निःशस्त्र भागात सहभाग घेतला, सत्याग्रह करून जेल गाठला. ते म्हणजे बी. रामकृष्णराव. विशेषतः, या मंडळीतील कै. फुलचंदजी गांधी कडवे संयुक्त महाराष्ट्रवादी, सशस्त्र

लढ्यात पूर्णशक्तीनिशी भाग घेतलेले आणि कडवे कम्युनिस्टविरोधक होते. हे कम्युनिस्टविरोधक मरेपर्यंत ज्यांना इतरेजन कम्युनिस्ट म्हणतात त्यांच्याविषयी श्रद्धा बाळगणारे होते.

हैदराबाद संस्थानात पहिली सार्वत्रिक निवडणूक इ. स. १९५२ साली झाली. त्यानंतर जे मंत्रिमंडळ आले ते चौदाचे नसून तेराचे होते. या तेरा जणांत चार महाराष्ट्रीय होते, दोन कानडी होते, एक मुसलमान, एक हरिजन होता व पाच तेलगू मंत्री होते. वरवर दिसणाऱ्या या चित्रातही महाराष्ट्रीय सहभाग एक–तृतीयांशच होता, निम्मा नव्हता; आणि हे वरवर दिसणारे चित्र खरे नव्हते. दोन कानडी मंत्र्यांपैकी एक मंत्री तेलंगणचाच प्रतिनिधी होता आणि चार महाराष्ट्रीय मंत्र्यांपैकी एकजण तेलंगणचाच नेता होता. काशीनाथराव वैद्य स्पीकर होते, मंत्री नव्हते. भगवंतराव गाढे उपमंत्री होते, मंत्री नव्हते. खेळीकर या नावाचे कुणी मंत्री या मंत्रिमंडळात नव्हते.

तेलंगणमध्ये कम्युनिस्ट–चळवळ ही कॉम्रेड रणदिवे यांनी पेटविलेली चळवळ नव्हती. रणदिवे हे अखिल भारतीय कीर्तीचे नेते असतील, पण तेलंगणची संघटना कॉ. राजबहादूर गौड, कॉ. रविनारायण रेड्डी व कॉ. मखदुम मोहिउद्दिन (मखदुम हे प्रसिद्ध उर्दू कवी – माझे शिक्षक, नुकतेच कैलासवासी झालेले) यांची संघटना होती. आणि तिला साहाय्य जुन्या मद्रास प्रांतातील आंध्र विभागातून होते. त्याही वेळी रणदिवे यांच्याविषयी फार प्रेम नव्हते. ही तेलंगणची चळवळ स्वतंत्र तेलंगणसाठी नव्हती. तो अखिल भारतीय कम्युनिस्टांचा उठाव होता व त्याचा हेतू सर्व भारतात कम्युनिस्ट क्रांती करणे हा होता. कम्युनिस्ट पार्टी नेहमीच स्वतंत्र तेलंगणविरोधी राहिली, आजही स्वतंत्र तेलंगणविरोधी आहे.


हैदराबाद राज्यातील स्टेट–काँग्रेसवर नेहमीच दोन आरोप होत राहिले. पहिला आरोप म्हणजे ही माणसे मुस्लिम राजसत्तेविरुद्ध लढत असल्यामुळे व अहिंसेचे व्रत पाळीत नसल्यामुळे काँग्रेसचे नाव धारण करणारी पण हिंदुमहासभेची माणसे आहेत. या गैरसमजातूनच महात्मा गांधी-वधाच्यानंतर स्टेट–काँग्रेसची काही माणसे त्या वेळच्या मुंबई प्रांतात कैद करण्यात आली. सरदारांना बातमी कळल्या-नंतर या मंडळींची सुटका तावडतोब करण्यात आली. एक–दोघेजण मात्र काही महिने कैदेत होते. हैदराबाद संस्थानात राजा मुसलमान, शिक्षणाचे माध्यम उर्दू, जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत मुस्लिम प्राधान्य, वरिष्ठ नोकऱ्या आणि सामान्य नोकऱ्या यांत मुसलमानांना विशेषाधिकार – याच्या परिणामी जवळ जवळ सर्व मुस्लिम समाज निजामच्या व राजसत्तेच्या बाजूने असे. नव्वद टक्के प्रजा हिंदू होती, तिला कोणतेही लोकशाही हक्क मागणे ही जातीयवादी हिंदूंची चळवळ मानली जाई. इ. स. १९३८ साली त्या वेळच्या हैदराबादचे पंतप्रधान सर हैदरी यांनी स्टेट–कांग्रेस ी हिंदू जातीयवाद्यांची संघटना आहे, हाच आरोप केला होता.

या आरोपाला उत्तर प्रत्यक्ष महात्मा गांधींनीच दिलेले असल्यामुळ त्यावर भाष्याची गरज नाही. हैदरींना पाठविलेल्या उत्तरात गांधीजींनी म्हटले होते, "जी चळवळ शंभर टक्के जनतेला लोकशाहीचे अधिकार मागते आणि जिला तुमच्याच सांगण्यानुसार नव्वद टक्के प्रजेत पाठिंबा आहे, तिला 'जातीयवादी' म्हणण्याची चूक मी करणार नाही."

स्टेट–कॉंग्रेसवर दुसरा आरोप, हे सर्व कार्यकर्ते कम्युनिस्ट असल्याबद्दलचा! या आरोपाला मुख्य कारण कन्हैयालाल मुनशी यांच्या स्वार्थाला स्टेट–कॉंग्रेस आडवी आली, हे घडले आहे. श्री. मुनशी यांनी हैदराबाद संस्थानात अनेक भानगडी केलेल्या आहेत. त्यामुळे सरदार पटेलांनी पोलीस–ॲक्शन होताच हा माणूस ताबडतोब कामावरून दूर केला. आणि सरदार मरेपर्यंत या माणसाला मंत्रिमंडळात प्रवेश मिळू शकला नाही. मुनशींच्या कार्याविषयी मेनन ह्यांनीच आपल्या पुस्तकात सौम्य भाषेत नापसंती व्यक्त करून ठेवलेली आहे. यापूर्वी अनेकांनी स्टेट–कॉंग्रेसचे नेतृत्व कम्युनिस्ट असल्याचा आरोप केलेला आहे. माणसे डोळ्यांसमोर होती, आठवणी ताज्या होत्या म्हणून या आरोपाचे कुणी खंडनही केले नाही. आता त्या आठवणी क्रमाने विस्मृत होत आहेत, त्यामुळे पुन्हा एकवार काही बाबी सांगणे भाग आहे.

मराठवाड्यात कम्युनिस्ट पक्षाचे कार्य म्हणजे कॉ. व्ही. डी. देशपांडे, कॉ. सी. डी. चौधरी व कॉ. आर. डी. देशपांडे यांचे कार्य होय. म्हणून मराठवाड्यातील कम्युनिस्ट पक्ष ह्या 'तीन डी चा पक्ष' या नावाने ओळखला जातो. ही कम्युनिस्ट मंडळी सर्वांच्या बरोबर काम करीत होती; पण आरंभापासूनच यांचे आणि गोविंददास श्रॉफ यांचे मतभेद होते. गोविंदभाईंचा मुख्यत्वे कम्युनिस्टांशी मतभेद तीन मुद्यांवर होता. हे तीन मुद्दे वेळोवेळी गोविंदभाईंनी त्या काळी आपल्या व्याख्यानात स्पष्ट केलेले आहेत. गोविंदभाई म्हणत, राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा ह्या साम्राज्यवादविरोधी महत्त्वाचा लढा आहे. या लढ्यात पूर्ण शक्तीने भाग घेतला पाहिजे. हा लढा चालू असेपावेतो कामगार, शेतकरी, मध्यम वर्ग, छोटा मालक वर्ग या सर्वांचेच हितसंबंध एकसारखे आहेत. म्हणून हा लढा जनतेचा लढा आहे. तो केवळ कामगार लढा नाही व तो अखिल भारतीय नेतृत्वाच्या सल्ल्याने चालविला पाहिजे. त्या काळी गोविंदभाई पं. नेहरू, म. गांधी आणि सरदार वल्लभाई पटेल यांना नेते मानत. ते पं. नेहरूंचे अनुयायी होते, सरदारांशी त्यांचे संबंध घनिष्ठ होते. सरदारांनी शेवटपर्यंत गोविंदभाईंना आपल्या बाजूला आणण्याचा प्रयत्न केला, टाळण्याचा प्रयत्न केला नाही. माझी माहिती खरी असेल तर कांग्रेसमधून गोविंदभाई फुटून गेल्यानंतर सुमारे एक वर्षाने सरदारांनी गोविंदभाईंना पुन्हा कांग्रेसमध्ये येण्याची व मंत्री होण्याची 'ऑफर' दिलेली होती.

[ पृष्ठ ६२ वर ]



# आमचा चंद्रप्रवास

संकलन आणि अनुवाद : प्रा. रा. वि. सोवनी



# आर्मस्ट्रॉंग

"चंद्रावर तुम्ही पदार्पण करणार आहात" असे जेव्हा मागच्या जानेवारीत आम्हांला सांगण्यात आले त्या वेळी मला तरी ते अशक्य वाटले होते; कारण अद्याप अनेक गोष्टी अज्ञात होत्या, उदा. चांद्रयानातून आम्ही उतरणार त्याची चाचणी झालेली नव्हती. पृथ्वीपासून अतिशय दूर गेलेल्या दोन यानांशी एकदम पृथ्वीवरून संपर्क साधता येईल किंवा नाही ह्याची खात्री पटलेली नव्हती. मला असे प्रामाणिकपणे वाटले की, अपोलो–११ हे चंद्रावर जाणारे पहिले यान ठरणे शक्य नाही. खरे म्हणजे अजून खूप शिकायचे होते आणि प्रवासातील अनेक शक्यता व अडथळे दूर व्हावयाचे होते.

त्यानंतर अपोलो–९ आणि १० ह्यांचे प्रवास व कार्यक्रम अतिशय सुंदर रीतीने आणि अचूक पार पडले. त्या वेळेपासून आम्ही चंद्रावर उतरू शकू ह्याची मला खात्री वाटली. त्यानंतर मात्र आमची तयारी अविश्रांतपणे सुरू झाली. आमच्या सुरक्षिततेपेक्षा आम्हांला ह्या प्रवासाच्या यशाबद्दल जास्त काळजी वाटत होती. चंद्रावर पदार्पण करण्यात जर आम्ही यशस्वी झालो तर हे अशक्य कार्य यशस्वी होऊ शकेल ह्याची साऱ्या जगाची खात्री पटेल आणि त्यामुळे कदाचित मानवी समाजाच्या कठीण समस्याही सोडविल्या जातील अशी भावना निर्माण होईल. आमच्या देशाने ही अवघड कामगिरी 'नॅसा' संस्थेवर सोपविली होती. जसजसे ह्या प्रवासावर लोकांचे लक्ष केंद्रित होऊ लागले तसतसे 'नॅसा' संस्थेमधील हजारो कर्मचारी जिद्दीने कामाला लागले आणि ह्या प्रवासात अपयश आल्यास आपल्या देशाच्या कीर्तीला काळीमा लागेल असे त्यांना वाटू लागले. शरीरामधील रक्ताचा प्रत्येक बिंदू आम्ही तयारीसाठी वापरण्यास सिद्ध झालो. आमच्या सरावाच्या व

तयारीच्या काळात अनेक प्रश्नांची उत्तरे आम्हांला मिळाली नव्हती.

अनेक बारीक सारीक गोष्टींनी आम्ही बेचैन झालो होतो. आमचा पोशाख कसा असावा, आमच्या यानांची नावे कोणती ठेवावीत ह्याची आम्ही बारकाईने चर्चा करीत होतो. आमचा प्रवास हा साऱ्या मानवजातीचा प्रतिकात्मक प्रवास आहे ह्याची आम्हांला सतत जाणीव होती व म्हणूनच अगदी क्षुल्लक गोष्टींमधून-सुद्धा प्रतिकात्मक आविष्कार होण्यासाठी आम्ही धडपडत होतो.

चंद्रभूमीवर जे प्रतीक आम्ही ठेवले ते केवळ आमच्या देशाची राजमुद्रा नसून अमेरिकेचे चंद्रावरील शांततामय पाऊल वाटावे असेच तयार करण्यात आले होते. 'ईगल' हे नाव एवढयासाठीच निवडले की त्यामुळे प्रतिकाची प्रतिमा स्पष्ट व्हावी व देशालाही अभिमानास्पद वाटावे. 'कोलंबिया' हे नावही राष्ट्राचे प्रतीक आहे. त्यामुळे शंभर वर्षांपूर्वी ज्यूल व्हर्नने वर्णन केलेल्या प्रवासाचे प्रतिनिधित्व होत होते आणि त्याचबरोबर हे नाव आम्हांला कोलंबसाच्या जिद्दीची व साहसाची आठवण करून देत होते.

प्रवासापूर्वीची तयारी आम्ही करीत असताना हळूहळू आमचा आत्मविश्वास वाढला व त्यामुळेच प्रत्यक्ष प्रवास करताना माझ्यावर कसलेच दडपण मला वाटले नाही. चंद्रावर उतरण्याचा दिवस लांबलचक वाटला. कारण चंद्रभूमीकडे आम्ही उतरू लागलो त्या वेळी आमचा तो दिवस सुरू झाला. उतरण्यासाठी आम्ही एंजिन प्रज्वलित केले आणि चांद्रयान चंद्रभूमीकडे जाऊ लागले. भूमीपासून पन्नास हजार फुटांवर असताना माऊंट मरिलिन दिसू लागला. त्या वेळी दिसलेल्या इतर खुणांवरून आम्ही अचूक जात आहोत हे निश्चित झाले. आणखी वीस हजार फूट खाली आलो आणि गणक यंत्राचे काही तरी बिनसले. कारण तसा इशारा देणारा यंत्राचा दिवा लागला होता. हा इशारा गणक यंत्रात फार माहिती भरल्याचा आणि यंत्राला पडणाऱ्या कामाच्या जादा ताणाचा होता. हौस्टनच्या नियंत्रण केंद्राने आम्हांला तिकडे दुर्लक्ष करण्यास सांगून तुम्ही उतरण्याचे काम तसेच चालू ठेवा असा सल्ला दिला.

चंद्रापासून पाच हजार फुटांवर खाली उतरीपर्यंत आम्ही ह्या घोटाळ्यात व इतर कामांत इतके गुंग होतो की आम्हांला खिडकीतून डोकावण्यासुद्धा वेळ मिळाला नाही. तीन हजार फुटांवरून आम्ही प्रथम पाहिले तेव्हा चंद्रपृष्ठावरील वेस्ट क्रेटर आम्हांला दिसला. आमची यंत्रणा यानाला अगदी अचूक मार्गदर्शन करीत होती. परंतु एक हजार फुटांवर यान ज्या जागेवर होते ते योग्य नाही असे दिसून आले. खड्याच्या कडेला मोठमोठाले खडक इतस्तत: पसरलेले दिसत होते. चंद्र-पृष्ठावरचे खडक एकदम जवळ येताना दिसू लागले. ॲल्ड्रिन मला सूचना देत होता. ४०० फुटांवर ५० मैल वेगाने येत असताना मी अखेर यानाचे नियंत्रण माझ्या हाती घेतले. आमच्या यानाचा वेग सेकंदाला तीन फुटापर्यंत मी कमी केला.

पूर्वनियोजित जागी उतरण्याचा मोह मी टाळला व यानाला थोडेसे बाजूला घेऊन मी अखर सपाट प्रदेशावर यानाचे पाय टेकविले.

आम्ही सराव करीत असताना जे अनुभव घेतले त्यापेक्षा वेगळे असे प्रत्यक्षात काहीही आढळले नाही. मला तर मी जणू पृथ्वीवरचा नेहमीचाच सराव करीत आहे असे वाटले. आमचे शिक्षण मुळी इतके परिपूर्ण होते की, चद्रावर उतरत आहोत म्हणजे काहीतरी वेगळे करीत आहोत असा भाससुद्धा झाला नाही.

चद्रावर उतरत असताना आमच्या यानाने बरीच धूळ वर उडविली. पृथ्वीवर ही धूळ आली असती पण चद्राचे आकर्षण कमी असल्यामुळे धूळ खाली बसायला तर वेळ लागलाच पण ती सरळ खाली त्याच जागी न येता पसरत पसरत लांबपर्यंत जाऊन उतरत होती. त्यामुळे मला धुळीतून पलीकडचे दिसत होते. उतरण्याच्या अखरच्या टप्प्यात मला इंधनाबद्दल फार काळजी वाटत होती. कारण इंधन संपत आल्याचे काटा दर्शवीत होता. यान जेव्हा चंद्रभूमीवर स्थिर झाले तेव्हा फक्त ४० सेकंद पुरेल एवढेच इधन शिल्लक होते. अर्थात परतीच्या प्रवासासाठी वेगळा साठा होता त्यामुळे काळजी नव्हती. चंद्रभूमीवर स्थिरावल्यावर पहिली १२ मिनिटे आम्ही अतिशय कामात होतो. शिल्लक राहिलेले इधन टाकीतून मोकळे करणे आवश्यक होते. कारण उष्णतेने ते पेटून स्फोट झाला असता. म्हणून प्रथम टाक्या मोकळ्या केल्या. नंतर ॲल्ड्रिनने माझ्याशी हस्तांदोलन करून माझे अभिनंदन केले. माझ्या एका जवळच्या टीकाकाराने केलेले हे अभिनंदन अर्थातच मला फार मोलाचे वाटले. मला आनंद झाला.

चांद्रयानाच्या बाहेर लवकर पडण्याचे आम्ही दोघांनी ठरविले होते. परंतु काही अनपेक्षित कारणांनी त्याला वेळ लागला. पहिले म्हणजे आमच्या यानातील हवेचा दाब संपूर्ण काढून टाकण्यास आमच्या अपेक्षेपेक्षा अधिक वेळ लागला. यानाच्या बाहेर चंद्रावर निर्वात पोकळी होती. यानाचे दार उघडण्यासाठी यानातील हवेचे निर्गमन करून यानात निर्वात पोकळी करणे जरूर होते. म्हणून आम्ही यानातील सर्व हवा सोडून दिली. तरीसुद्धा आमच्या स्वतःच्या पाठीवरील हवेच्या पिशवीतील हवा आत राहतच होती. ही क्रिया आम्हांला पृथ्वीवर कधीच परिपूर्ण करता आली नव्हती. त्याशिवाय आमच्या पाठीवरील शीतकरणाची यंत्रणा कार्यान्वित होण्यास वेळ लागला. माझ्या पत्नीला किंवा इतर मित्रांना त्या वेळी वाटले होते की चंद्रावर उतरल्यावर पहिले वाक्य कोणते म्हणावे ह्याचा मी विचार करीत होतो, म्हणून मला बाहेर पडण्यास वेळ लागला. परंतु ते खरे कारण नव्हते. कारण त्यासंबंधीचा विचार मी प्रवासाच्या सुरुवातीच्या काळातच केला होता. तरीसुद्धा मी जेव्हा यानाच्या बाहेर आलो तेव्हा पहिले वाक्य कोणते म्हणावे ते नक्की झाले नव्हते. शेवटी मी विचार पक्का करून उतरल्यावर म्हणालो की माणसाचे हे एक छोटे पाऊल असले तरी मानवतेचे महान पाऊल आहे. ह्या शब्दांशिवाय

माझ्या मनात दुसरी कोणतीही भावना नव्हती.

यानामधून चंद्रभूमीकडे पाहिल्यावर ती उबदार आणि अगत्यशील वाटली. आकाश काळेकुट्ट होतं. पण पृष्ठावर भरपूर उजेड होता. त्या प्रकाशात चंद्रभूमी तपकिरी रंगाची दिसत होती. ह्या रंगाची गंमत अशी आहे कीं ते सूर्यप्रकाशाच्या पडणाऱ्या कोनाप्रमाणे बदलतात. ज़मिनीवरची माती उचलली तर तीसुद्धा काळी किंवा राखी रंगाची दिसते आणि ती एखाद्या पिठासारखी कणीदार असते.

चंद्रभूमीवर काम करणे सुखद होते. प्रश्न एवढाच होता की तेथील सर्वच गोष्टी मला बघावयाच्या होत्या. परंतु ते अर्थातच अशक्य होते. चंद्रावर आम्ही कोणत्या वस्तू ठेवल्या त्या आता बहुतेक सर्वांना माहिती आहेत. विशेषतः ग्रिसम, व्हाईट आणि चॅफी ह्या तीन अमेरिकन हुतात्म्यांचे प्रतीक म्हणून त्यांची पदके ठेवताना आम्हांला विशेष आनद वाटला. त्याशिवाय गागारिन आणि कामोरॉव्ह यांचीही स्मृतिचिन्हे ठेवताना आनद झाला. माझी अशी खात्री आहे की आमचे सोव्हिएट सहकारी आमच्याच आशा व आकांक्षांची स्वप्ने पाहत असले पाहिजेत आणि ह्याचा खात्री मला येथे परत आल्यावर मिळाली. कारण त्यांच्याकडून आलेल्या अभिनंदनाच्या तारेची सुरुवात ' प्रिय सहकाऱ्यांनो ' अशी होती. चंद्रभूमीवरून गोळा केलेले अनेक नमुने आम्ही परत आणले.

चांद्रयानात आम्ही परतलो. आत हवा सोडून परत दाब निर्माण केला. यानात एक विशिष्ट प्रकारचा वास येत होता आणि तो चंद्राच्या खडकांचाच असावा अशी माझी समजूत आहे. चंद्रावर फिरत असताना तेथील तपमानाची जाणीव मला अजिबात झाली नाही. कारण आमच्या कपड्यांमधून नियंत्रित केलेले तपमान फार सुखद होते. तेथे ज्या यंत्रणा आम्ही उभारल्या त्याही आम्हांला विशेष गरम किंवा थंड वाटल्या नाहीत.

ह्या सर्व प्रवासाबद्दल विचार करीत असताना मला दोन घटना फार महत्त्वाच्या वाटतात. एक आमच्या यानाचा चंद्राला झालेला स्पर्श आणि दुसरे म्हणजे त्याने केलेले परतीचे उड्डाण. ह्या उड्डाणाबद्दल मला जरा काळजी वाटत होती पण ते अतिशय उत्कृष्ट रीतीने पार पडले. वर उडाल्यावर ' ट्रॅन्क्विलिटी बस'चा दिसणारा देखावा सतत ध्यानात राहील. मी आणि ॲल्ड्रिन जेव्हा चंद्रभूमीवर चालत होतो आणि छायाचित्रे घेत होतो त्या वेळी एकच विचार माझ्या मनात प्रबळ झाला; तो म्हणजे मी विश्वातल्या एका स्थिर भूमीवर चालत आहे व तिचे छायाचित्रण करीत आहे. हजारो वर्षांनी जरा मानव पुन्हा तिथे गेला तरी त्याला हेच चित्र दिसून येईल. ह्या प्रवासातील एक हृद्य देखावा माझ्या मनात वारंवार येतो. आम्ही जसजसे चंद्राजवळ येत होतो तसतसे त्याचे स्वरूप प्रकट होत होते. आम्ही त्याच्यापासून हजारो मैल दूर होतो त्या वेळी खिडकीतून संपूर्ण चंद्र दिसत होता व त्याने सूर्याला झाकून टाकले होते. त्याच्या पार्श्वभूमीतून दिसणारा सूर्याचा प्रकाश मी कधीच

विसरणार नाही. त्याच्या पाठीमागच्या बाजूस आम्ही जेव्हा गेलो तेव्हा तेथे पृथ्वीवरचे चांदणे पडले होते. मला अशी सतत जाणीव होती की, चंद्र हा तबकडीप्रमाणे नसून संपूर्ण गोल आहे. तो पृथ्वीसारखाच आहे. तो आमचे स्वागत करील अशी आमची खात्री होती. आजपर्यंतच्या दीर्घकाळात तो पाहुण्यांच्या आगमनाकरताच खोळंबला होता असे वाटते. ☐



## एड्विन ॲल्ड्रिन

चंद्रावर उमटलेले आमच्या पायांचे ठसे किती काळ तेथे रेंगाळत राहतील याचे मला फार कुतूहल आहे. पदचिन्हे उमटविण्यास तो पृष्ठभाग फारच चांगला होता. चंद्रावरचे वातावरण काम करण्यास सुखद व नैसर्गिकच वाटले. वजनविरहित अवस्थेचे सर्व फायदे त्या ठिकाणी मिळत होते. हालचाली करण्यास फार जोर लागत नव्हता. शून्य गुरुत्वाकर्षणात खाली-वर असा भेद नसतो आणि तोलही सांभाळावा लागत नाही. पण चंद्रावरच्या ⅙ निकृष्टीत (गुरुत्वाकर्षण) बाजूंची निश्चितता आणि थोडाफार तोल सांभाळण्याची जाणीव असते. चंद्रावरचे चालणे काही वेगळे नव्हते. एकएक पाऊल उचलूनच आम्ही चालत होतो. कांगारूप्रमाणे दोन पायांवर उड्या मारीत जाणेदेखील शक्य होते. फक्त एकच की तेथे भरभर चालता येत नाही. पृथ्वीवर दिशा बदलताना एका पायाचा उपयोग करता येतो. पण तेथे चालण्याने आलेला वेग तुम्हांला इतक्या सहजासहजी वळू देत नाही. तोल सांभाळण्याची क्रिया अवघड नाही. पण तिची सवय करावी लागते. म्हणून भावी प्रवाश्यांना माझा असा सल्ला आहे की त्यांनी उतरल्यावर तोल सांभाळण्याची सवय करून मगच चंद्रभूमीवरील कार्याला लागावे. तेथे एक अडचण येते की तुम्ही पुढे झुकला आहात की मागे झुकले आहात आणि किती झुकले आहात हे समजत नाही. ही

अडचण आणि तेथील मर्यादित क्षेत्र ह्यामुळे पृष्ठभाग उतरता दिसतो. पाठीवरील ओझ्याचे वजन फक्त वीस पौंड (पृथ्वीवर १२४ पौंड) होते तरी त्याची खेच जाणवत होती. म्हणून जरा पुढे वाकूनच तेथे चालावे लागते. कोणीतरी म्हणाले की, माणूस थकलेल्या माकडाप्रमाणे वाटला आणि ते खरेच आहे. त्यामुळेच तुम्ही केव्हा ताठ उभे राहता हे समजत नाही. स्वतःच्या शरीराचा गुरुत्वमध्य सापडणे कठीण जाते. साधारणपणे न पडता कोणत्याही बाजूला सहज झुकता येते. आमच्यापैकी कोणीच पडला नाही. आम्हांला असेही वाटले की, गुडघ्यावर बसून सहज परत उठता येईल. खाली पडलेली एक फिल्म नीलने सहज उचलली होती. चंद्रपृष्ठ सर्वच सारखा नव्हता. काही ठिकाणी कठीण तर काही ठिकाणी भुसभुशीत होता. त्यामुळे आमचे पाय कधी पाव इंच तर कधी चार इंचांपर्यंत आत जात होते. पुष्कळसे खडक सहजासहजी हलविता येत होते व म्हणूनच आम्ही लहान खडकांवर पाय देण्याचे टाळले.

प्रचंड आकाराचे खड्डे किंवा खडक आमच्या आसपास नव्हते. चंद्रभूमीचा रंग कोणता असेल ह्या संबंधी आम्ही बरीच चर्चा केली होती. मला वाटत होते की चंद्रावर जांभळा रंग दिसेल. पण माझ्या तेथील वास्तव्यात मला तो रंग कधीच दिसला नाही. चंद्रावरील वाटचालीत मला किंवा नीलला कधीही थकवा आला नाही. त्यामुळेच थांबावे व विश्रांति घ्यावी असे आम्हाला वाटले नाही. चांद्रयानात परत येताना शिडीची पहिली पायरी चढणे जरा कठीण वाटेल अशी माझी कल्पना होती. परंतु थोडीशी उडी मारल्यावर ते सहज साध्य झाले; एवढेच नव्हे, आम्ही सगळ्या पायऱ्या चढण्याच्या भानगडीत पडलोच नाही. एक उडीतच अनेक पायऱ्या चढता आल्या.

चंद्रावर आम्हांला एक वेगळी अडचण जाणवली. पृष्ठभागाखालच्या मातीचे नमुने गोळा करताना आम्हांला जरा त्रास झाला. कारण पृष्ठाखाली थोड्या इंचांवरच आमच्या दांडक्याला घट्ट जमिनीचा विरोध जाणवत असे. ह्याचा अर्थ तिथे खडक नव्हते, पण मातीचे कण निर्वात पोकळीमुळे एकमेकांशी संघटित झाले होते व म्हणून तो प्रतिकार होता. दुसरी गंमत अशी की निशाणाचा दांडा जेव्हा रोवला तेव्हा प्रथम तो स्थिरच राहीना. कारण खालून त्याला बाजूचा आधारच मिळत नव्हता. त्यामुळे तो ठोकत असताना त्याचे वरचे टोक एका हाताने धरून दुसऱ्या हाताने हातोडा मारावा लागत होता. पण ठोका मारताना माझे शरीर हलत असे व त्यामुळे दुसऱ्या ठोक्याच्या वेळी तो दांडा पाहिजे त्या जागी नसे. साहजिकच एक-दोन वेळा हातोड्याचा ठोका चुकला. मग हे ध्यानात आल्यावर मी अधिक काळजी-पूर्वक काम केले.

पृष्ठाखालची माती बाहेर काढली तेव्हा ती ओलसर असावी असे मला प्रथम वाटले. माती बाहेर काढणारी यंत्रे चंद्रावर चांगले काम करतात, पण त्याच-

बरोबर फावड्याने व कुदळीने उकरून चर खणणे मात्र कठीण असते. कारण एकतर पृथ्वीवरचे वजन चंद्रावर कमी होते त्यामुळे जोर मिळत नाही. आणि दुसरे म्हणजे सर्व जोर लावून चालत नाही. कारण तोल बिघडण्याचा संभव असतो.

चंद्रावरील वातावरण वैशिष्टचपूर्ण आणि गूढ वाटले. आम्ही दोघेही जरा अबोलच आहोत. आमच्या सरावाच्या वेळीसुद्धा आम्ही एकमेकांशी मोकळेपणाने गप्पा मारल्या नाहीत. परंतु चंद्रावर काय झाले कोणास ठाऊक! एकाक्षणी आम्ही दोघांनी एकमेकांकडे पाहिले आणि एकमेकांच्या पाठीवर थाप मारून अखेर आपण जिंकले किंवा असेच काही म्हणालो. जगापासून इतक्या लांब अंतरावर एकाकी असणारे आम्ही दोघे पहिलेच मानव असलो पाहिजेत. पण त्याच वेळी जगातल्या अनेक लोकांशी आम्ही घनिष्ठ संबंधित होतो हेही खरे आहे. प्रेसिडेंट आमच्याशी दूर-ध्वनीवर संपर्क साधणार आहेत ह्याची आम्हांला अजिबात कल्पना नव्हती. केवळ दहा सेकंद अगोदर आम्हांला कळविण्यात आले. आम्हांला प्रथम निशाणाजवळ जाण्याचे सांगण्यात आले व नंतर प्रेसिडेंट आमच्याशी बोलले. तो क्षण मोठा विलक्षण होता. कारण त्याचक्षणी प्रेसिडेंट निक्सन ह्यांच्या रूपाने जणू सारे जगच आमच्याशी बोलले.

अपोलो – ११ चे प्रतिक मला विशेष आवडले. कारण आमच्या राष्ट्राचे प्रतिक गरुडपक्षी त्यावर कोरलेला होता. एवढेच नव्हे तर त्याच्या पायात शांततेची निदर्शक म्हणून ऑलिव्हची फांदी होती. 'चंद्रावर आम्ही शांततेसाठी येथे आलो.' ही संदेश देणारी पट्टी आम्ही ठेवली. त्याचबरोबर खड्यांच्या बनविलेल्या ऑलिव्हच्या चार फांद्या मी बरोबर आणल्या होत्या. त्यांतील एक तेथे रोवली. चांद्रयानाच्या बाहेर केव्हा पडावयाचे ह्यासंबंधी मी नीलशी चर्चा करून ठरविले होते. उतरल्यावर आम्ही फारसे थकलेलो नव्हतो म्हणून आम्ही यानाच्या बाहेर लवकरच पडलो व नंतर झोप घेतली. आमचे चंद्रभूमीवरचे कार्य चांगले पार पडले. पण झोप मात्र चांगली मिळाली नाही.


चंद्रावर उबदार असावे असे वाटले, पण तेथील सूर्यप्रकाश शरीरावर पोशाखा-मुळे कधीच पडला नाही. सूर्याचे किरण बाजूने आत शिरले तर आमचे सारे शिरस्त्राण चमकू लागे आणि सावलीत गेल्यावर शिरस्त्राणाच्या काचेवर आमचे प्रतिबिंब पडून समोरचे काहीच दिसत नसे. त्यामुळे थोडासा त्रास झाला एवढेच! चंद्रपृष्ठावर चालताना बुटांमुळे धूळ उडत असे पण ती तेथेच खाली न पडता लांबवर जाऊन पडत असे.

मी चांद्रयानात (ईगल) शिरलो तेव्हा मला ते इतके परिचित वाटले की 'मी हे पाहिले आहे, मी येथे पूर्वी आलो होतो' अशी भावना मला झाली. चांद्रयानाचा तो परिचितपणा एक प्रकारे ज्यांनी ते तयार केले व ज्या प्रकारचे शिक्षण आम्हांला मिळाले त्या पद्धतीचा गौरव होता. चांद्रयानातून जेव्हा मी प्रथमच बाहेर चंद्राकडे पाहिले त्या वेळी तो इतका सुखद वाटला की नुसत्या शर्ट-पँटमध्ये बाहेर जाऊन

उन्हात बसावेसे वाटले. दुर्बिणीतून पृथ्वी दिसत होती. पण आमच्या तिसऱ्या सहकाऱ्याच्या यानाचे दर्शन मात्र कधीच घडले नाही. त्याच्याशी आमचा संपर्क साधलेला होता आणि त्याच्या आवाजामुळे आम्हांला फार सुरक्षित वाटत होते. चांद्रयानाचे चंद्रपृष्ठावरील अवतरण इतके हळुवार झाले की आम्हांला त्याची जाणीवसुद्धा झाली नाही. त्याचप्रमाणे परतीचे उड्डाणही तितकेच सुखकर झाले.

चांद्रयानात आमच्याबरोबर चंद्रावरची बरीच धूळ आत आली. मला वाटत होते की वजनविरहित अवस्थेत ही धूळ यानात सर्वत्र तरंगत राहील. सुदैवाने तसे काहीच घडले नाही.

ह्या प्रवासाचे महत्त्व काय असावे यासंबधीचे विचार सांगणे फार कठीण आहे. केवळ तीन माणसे किंवा एखाद्या देशाचे प्रतिनिधी त्या ठिकाणी गेले ही भावना बिलकुल नव्हती. मनुष्य केव्हा ना केव्हा तरी चंद्रावर पदार्पण करणारच होता. माणसाने चंद्राकडे प्रथम पाहिले त्या दिवसापासूनच हे आव्हान त्याच्यापुढे होते आणि तो ते स्वीकारणार ह्यात बिलकुल शंका नव्हती. चंद्रावर मी परमेश्वराची प्रार्थना केली. माझ्या चर्चमधील धर्मगुरू डीन वुडरफ ह्यांनी मद्य भरलेला प्याला माझ्याजवळ दिलेला होता. ते मद्य मी चंद्रावर ओतून परत आलो. आमच्या कामाचा आणि मिळालेल्या संधीचा मी फार विचार करीत होतो. मला अशी आशा आहे की या प्रवासाकडे लोक केवळ एक तांत्रिक यश म्हणून न पाहता 'आव्हानात्मक शोध' व आपण सारी ईश्वराचीच लेकरे आहोत या दृष्टीने पाहतील. ◻



# मायकेल कॉलिन्स

आठ दिवसांचा आणि पाच लाख मैलांचा प्रवास कमी शब्दसंख्येत मर्यादित करणे केवळ अशक्य आहे. माणसांनी क्वचित पाहिलेल्या अनेक गोष्टी मी तिथे पाहिल्या. माझ्या दृष्टीने चांद्रयान ज्या वेळेस परत आलेले मी पाहिले ते दृश्य सर्वांत सुंदर होते. मला तर अतिशय आनंद झाला कारण याचा अर्थ असा होता की, माझे सहकारी चंद्रावर उतरले आणि परतही आले. चंद्राचे दर्शन मित्रत्वाचेच वाटले. चांद्रयान जवळ आले आणि गणक यंत्राच्या मदतीने ते आम्ही एकत्र जोडले. मी लगेचच सहकाऱ्यांना भेटण्यासाठी तरंगतच यानाच्या दारात पोहोचलो. दोन यानांमधील बोगद्यातच आम्ही भेटलो आणि मी त्यांच्याशी हस्तांदोलन करून त्यांचे स्वागत केले.

प्रवासाच्या सुरुवातीचा काळ थोडा गडबडीचा गेला. अग्निबाणाचा पहिला टप्पा गळून पडला आणि दुसरा टप्पा तर अगदी निमूटपणे अलग झाला. अशा प्रकारचा लांबलचक प्रवास म्हणजे नाजूक क्रियांची साखळीच असते. त्यातील एखादी जरी बरोबर झाली नाही तरी प्रवास अर्धवट सोडून परत यावे लागले असते. मला अनेक लोक विचारतात की नील आणि ॲल्ड्रिन चंद्रावर होते त्या वेळेस मला एकाकी वाटले नाही का? पण गेल्या सतरा वर्षांचा विमान चालविण्याचा अनुभव असल्यामुळे मला तसला एकाकीपणा कधीच जाणवला नाही. माझे यान 'कोलंबिया' मला घराइतकेच प्रिय होते. चंद्रावर उतरलेले 'ईगल' मी कधीच पाहिले नाही. प्रथम मला असे वाटले होते की ते मला केव्हातरी दिसेल पण मी अशा काही विशिष्ट कोनांत चंद्राभोवती फिरत होतो की ते दिसणे जवळजवळ अशक्य होते. नील आणि ॲल्ड्रिन हे दोघेही पृथ्वीशी सतत संपर्क साधून होते. पण माझ्या भ्रमंतीत मी ज्या वेळी चंद्राच्या पाठीमागे जात असे त्या वेळी माझा संपर्क

तुटत असे. पृथ्वीवरच्या ज्या काही थोड्या लोकांनी प्रत्यक्ष चंद्रपदार्पण टी. व्ही. वर पाहिले नाही त्यांच्यांतलाच मी पण एक आहे. कारण 'कोलंबिया'त टी. व्ही. ची व्यवस्था नव्हती.

प्रवासापूर्वी मी या प्रवासात कितपत झोपेन याबद्दल मला शंका होती. परंतु त्या मानाने मला चांगली झोप मिळाली. माझ्या मिशांबद्दल लोकांना बरेच कुतूहल वाटते. वास्तविक यापूर्वीही अनेक वेळा मी मिशा ठेवल्या आहेत. पण परत आणलेली मात्र ही पहिलीच आहे. प्रवासात या फार वेड्यावाकड्या वाढतात. टॉम ड्युईसारख्या मिशा वाढवाव्यात असे मला वाटते पण मी त्या किती दिवस ठेवीन याची मला शंका वाटते. कारण माझी मुल तर याविरुद्ध आहेतच, पण माझी पत्नीही बहुधा विरोधी गटात असावी. त्यामुळे मला त्यांना चाट द्यावी लागणारच आहे.

आमचा एकांतवास मला तरी कंटाळवाणा वाटला. पण कोणालाही चंद्रदोष झालेला नाही हे मला समजले तेव्हा फार आनंद झाला. चंद्राभोवती ६० मैलां-वरून फिरत असताना सूर्यकिरणांच्या बदलत्या कोनाप्रमाणे चंद्राचा रंग बदलत जातो. पहाट, मध्यान्ह, सायंकाळ व रात्र अशी मालिका चंद्राभोवती भ्रमण करीत असताना परत परत दिसते. त्या वेळी चंद्राचा रंग फिक्कट राखी, काळसट राखी आणि काळा असा होत जातो. मी जेमिनी–१० मधून ज्या वेळी पहिला प्रवास केला त्या वेळेस मी इतका कामात होतो की बाहेर बघण्यास मला सवडच झाली नाही. परंतु या वेळेस मात्र मनसोक्त पाहून घेतले.

प्रवासात घरासंबंधीचे विचार सारखे येत होते पण ते केवळ कुटुंबापुरतेच मर्यादित नसून साऱ्या पृथ्वीबद्दलचेच होते. विश्वातल्या दोन वस्तू मी पाहिल्या आहेत त्या म्हणजे पृथ्वी आणि चंद्र. त्यांपैकी चंद्र हा जरी वैराण वाळवंटासारखा असला तरी तो खूप चांगला आहे. पण अर्थातच या दोहोंत मी पृथ्वी अधिक पसंत करीन. मला अशी आशा आहे की या अंतराळप्रवासातील तांत्रिक ज्ञानाचा फायदा ही पृथ्वी सुंदर ठेवण्यासाठी जास्तीत जास्त केला जाईल. आपण माणसे खरोखरीच फार भाग्यवान आहोत; कारण पृथ्वीइतका दुसरा सुंदर ग्रह नाही. तिचे सौंदर्य अंतराळातूनच इतके खुलून दिसते की त्याची कल्पना तिथे राहणाऱ्या लोकांना येणार नाही म्हणूनच माणसांनी ही पृथ्वी निरोगी व स्वच्छ ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे.

यंत्रापेक्षा माणसे मला आवडतात. परंतु काही यंत्रांवर मानवापेक्षाही अधिक प्रेम करावेसे वाटते. 'कोलंबिया' हे त्यातीलच एक यंत्र होते. त्यातून आम्ही चंद्रापर्यंत गेलो आणि सुखरूप परत आलो; म्हणूनच त्याचे विच्छेदन करून ते सुटे करावे असे मला वाटत नाही.

◻ ◻ ◻

कोणतं गाव आहे हे कोण जाणे! पण खूपच चांगलं शहर दिसतंय, पण शहरात राहायला नको वाटतं. त्यापेक्षा खेडंच परवडलं. तिथली माणसं निदान माझी गोष्ट ऐकून घेण्याइतकी तरी मोकळी असतात. जरा डोळ्यांतून पाणी काढतात. मला समाधान वाटतं. फसवं समाधान! पूर्ण समाधान कधीच नाही. कारण फार बोलल्यानं आळसावलेलं माझं दुःख जागं होतं! आणि मग जे व्हायचं तेच होतं. परत बेचैनी वाढत जाते. परत एखादा आळशी माणूस सापडे पर्यंत. तुम्हांला त्याचा अनुभव असेलच. दुःख टोचायला लागतं पायातल्या काट्या-प्रमाणं. मग त्याचं कुरुप तयार होतं. ते उकरून काढोपर्यंत मी इतका हळवा बनतो की, जरा हवा कुंद झाली की, माझ्या डोळ्यांतून टिपं गळायला लागतात आणि माझी कथा म्हणा, व्यथा म्हणा, मूर्खपणा म्हणा,...ऐकायला एखादा माणूस मिळे-पर्यंत माझी अवस्था ताजी जखम झालेल्या माणसासारखी होते. जरा हात लावला की कळ मस्तकात जाते हो! पण मला माझी दुःखं सांगायला माणूसच लागतो.

---


# ऐकणेचा कैदी

राजश्री ठकार

---

उगीचच फुलांना, झाडांना, वेलींना किंवा पाखरांना गोष्टी सांगायचा वेडेपणा मी करीत नाही. मी काही कवी मनाचा नाही. माझ्या दुःखाबद्दल सहानुभूती दाखविली गेलेली मला आवडते. कुणी कुणी म्हणतं, की याचा अर्थ तू अगदी सामान्य माणूस आहेस. हो. मी अगदी सामान्य माणूस आहे आणि मला त्याबद्दल यत्किंचित दुःख नाही; किंवा माझा आग्रहही नाही की, मला कुणी 'असामान्य व्यक्ती' म्हणावं. असामान्य म्हणावं असं माझ्यात काहीच नाहीय. तसा मी दिसायला बरा आहे. उंची आहे सहा फूट, जरा जास्तीच आहे. पण ती एवढी आहे. डोळे आणि केस अमावास्येच्या रात्रीइतके काळे आहेत. अजून एकसुद्धा पांढरा केस नाही सापडत! रंग मूळ गोरा होता पण सतत फिरण्यामुळं आणि वयामुळं काळ-वंडलो आहे. पण त्यामुळं तांबूसही झालो आहे! एक अतिशय विलक्षण गोष्ट म्हणजे या दुःखाचा माझ्या शरीरावर थोडासुद्धा वाईट परिणाम नाही. शरीर सुकलं नाही. कालवंडलं आहे एवढंच. बाकी अगदी तजेलदार आहे. वयाचा-सुद्धा परिणाम नाही. आता पाहा. कालच मला ४५ वर्षे पूर्ण झाली. ४५ म्हणजे

काय कमी झाली ? पण अजून मी तिशीतला वाटतो. मला काही फार अभिमान वाटतो याचा असं नाही. पण परिस्थिती सांगतो. एवढं सांगूनही कुणाला पटलं नाहीतर सोडून द्या. खूप अभिमान वाटत असता तर, आतापर्यंत तसा राहिलो नसतो. केव्हाच दुसरं लग्न केलं असतं. छे ! कायद्याच्या विरुद्ध नाही. पहिली बायको सध्या या जगात नाही. परत येण्याची शक्यता नाही. पुनर्जन्मावर माझा विश्वास आहेही आणि नाहीही. माझ्या-समोरचा माणूस जर पुनर्जन्मावर विश्वास ठेवणारा असेल तर, मी माझा विश्वास नाही म्हणतो. आणि तो जर विश्वास ठेवणारा नसेल तर मी आहे म्हणतो. एकूण काय माझं निश्चित असं मत काहीही नाही. तर काय सांगत होतो...दुसरं लग्न केलं असतं. कारण मी दरिद्रीही नाही. माझ्या मालकीच्या चाळी आहेत. शिवाय शेअर्स आहेत. आणि पूर्वजांनी जमविलेल्या सोन्याच्या ३०-४० शेर वजनाच्या चिपा आहेत. त्यातलं १०-१५ शेर मी नुकतंच देऊन टाकलं देवालयाला. नाव आलं होतं म्हणतात. का दिलं ते मला कळलं नाही. मीसुद्धा काही रिकामा बसलो नाही. विक्रेत्याचं काम करतो, त्यामुळंच तर, गावोगाव फिरावं लागतं. त्यामुळं मला बराचसा अनुभव आला आहे. मी पहिल्यांदाच नाही का सांगितलं की, अशा गावोगावच्या भ्रमंतीमुळंच मला माझं दुःख सांगायला माणसं मिळतात. माझं दुःख काय आहे हे विचाराल, तर तेच मी सांगणार आहे. त्यासाठीच लिहिण्याचा एवढा खटाटोप केला.



"भैयाजी ऽऽ ही माझी छोकरी..." ठेवलेली...एवढं दचकून जायला नको.

वय वर्षं नऊ. बाकी माणसं स्वार्थासाठी आपली पोटची पोर विकायलादेखील कमी करीत माहीत. एक वर्ष ती माझ्याजवळ आहे. कायद्याने ती माझी आहे. फारशी दिसायला सुंदर नाही. पण आता कपडे वगैरे चांगले घालते म्हणून बरी दिसते. केसांचा बॉब करून दिलाय. खूप प्रेम करते माझ्यावर 'बाबा' म्हटलं की तिला तिच्या मारकुटया बाबांची आठवण होते म्हणून ती मला 'भैयाजी' म्हणते. लाडीक लाडिक बोलत असते माझ्याशी. शाळेतल्या गमती सांगते. बोर्डिंगस्कूलमध्ये ठेवून दिलंय्. माझी फिरतीची नोकरी ! त्यामुळं असं करावं लागलं. कुणी मला म्हणतात की, तुम्ही उगीचच तिला जवळ ठेवलीत. चांगले मोकळे होतात वाटेल ते करायला. पण प्रश्न पडतो, आता कुठं मी बांधील आहे ? त्या गावात गेलो म्हणजे तिला भेटतो. पण आता दिवाळीची सुट्टी आहे म्हणून माझ्याचबरोबर भटकतेय....

"भैयाजी..."

"काय ?"

"या हॉटेलात उतरायचं आपण ?"

"हो बेटी..." मधून मधून 'बेटी' म्हणतो तिला. खूष होते.

"मज्जा ! भैयाजी किती दिवस राहायचं ?"

"माझं काम झालं की निघायचं !" मला नको असताना माझ्या आवाजात शुष्कपणा, कडवटपणा येतो. ती हिरमुसली होते अगदी, माझ्या या अशा वागण्याने. आपणच तर बरोबर आणली तिला. ती काय मागं लागली होती. आल्यापासून पुढं पुढं करते. आपली मर्जी संपादण्यासाठी. सारखी गो ऽ ऽ ड गो ऽ ऽ ड आवाजांत 'भैयाजी' 'भैयाजी' करीत असते. परवा ती खोटं बोलली म्हणून तिच्या दोन थोबाडीत मारल्या आणि मग हातात चप्पल. चप्पलच होती बहुधा, त्या चपलेनं तिला अक्षरशः फोडून काढलं. अगदी क्षुल्लक कारण होतं. खरं म्हणजे तितपत खोटं ती पूर्वीसुद्धा बोलली आहे पण त्या दिवशी मात्र काय झालं कोण जाणे ? तेव्हा पण एका हॉटेलातच राहत होतो. आपल्या मारातून स्वतःचे अंग चुकवण्यासाठी सारखी खाली बसत होती आणि रडत रडत 'पुन्हा नाही खोटं बोलणार भैयाजी,' म्हणत होती. मधून एकदा 'बाबा, नका मारू' म्हणाली. स्वतःच्या खऱ्या बाबांची आठवण झाली असावी. तिचा हात माझ्या पोलादी पंज्यात होता. त्यामुळे ती सुटू शकत नव्हती. एवढयात शेजारच्या खोलीतली बाई आली आणि तिची सुटका केली. इतकं बेसुमार मारण्यासाठी पोरीला ठेवलंय का. स्वतःची नाही मग प्रेम प्रेम कुठून ? तिनंच ही माहिती दुपारी मी कामाला गेलो असताना त्या बाईंना दिली होती "हे काही माझे खरे बाबा नाहीत.... हे भैयाजी...मानलेले बाबा पण माझ्या खऱ्या बाबांपेक्षा चांगले आहेत."

"मग ही आपली पोरगी वाटतं म्हणून एवढं प्रेम आलंय ते...?" या शब्दांत मी तिची बोळवण केली. पण मागून दयेला मांडीवर घेऊन खूप रडलो. ती म्हणाली, "भैयाजी, मी पुन्हा तुम्हांला रडू येईल असं वागणार नाही, भैयाजी..."

नंतर मी तिला दोन सुंदर बाहुल्या आणि चॉकलेटचा एक डबा आणून दिला. दया, माझी दया. मला काही कळेनासंच व्हायला लागलंय. माझी दया माझ्याजवळ परत आली आहे. पण मनाला पाहिजे तितकं समाधान मिळत नाही. हिला वाणली यात माझी चूक झाली काय ?

माझ्या बायकोवर मी आयुष्यात फक्त दोन वेळा प्रेम केलं. एकदा तिला पाहायच्या वेळी आणि दुसऱ्यांदा ती वारली तेव्हा. बस्स ! दोन वेळा मी पाझरलो आणि तिला मिठीत घेतली. दोन्हीही वेळा ती निर्जीवच होती. पहिल्यांदा पहिली म्हणून घाबरलेली आणि शेवटच्या वेळी खरोखरचीच निर्जीव. या उप्पर तिचं माझं नातं नाही. तिचं नाव दया... मरताना म्हणाली...' सांभाळा स्वतःला, मी चालले...' मी म्हटलं इतके दिवस मीच मला सांभाळलं...तिच्या त्या निर्जीव होत चाललेल्या एकदम अश्रू आले. 'होय! ऽऽ मी मेली व्यर्थच तुमच्या आयुष्यांत आले. काऽ ऽ ही उपयोग नाही झाला. आनंद नाही.... '.

मला एकदम शरमल्यासारखं झालं. असं बोलायला नको होतं. पण बोललो. जाताना जखम केली. तेव्हा एकदम तिला मिठीत घेतलं. पण हाती केवळ निर्जीव कलेवर होतं. तेच मला जास्त लागून राहिलं होतं. तिला शेवटच्या क्षणी दुखावलं होतं. माझ्या मनात खरं तर तिला दुखवायचं नव्हतं असं म्हणून मी माझ्या मनाचं समाधान मानून घेतो; पण तरी ती जखम वाहती आहे. दया...माझी पत्नी... माणसं मला शुद्ध पशू म्हणतात ! म्हणेनात बापड. म्हणतात... "होती तेव्हा नव्हती किंमत. आता रडतोय..." अर्धं सत्य आहे ! म्हणजे पहिला भाग खरा आहे. दुसरा खोटा आहे. आता रडत नाहीय...फक्त एक छोटीशी ठुसठुसती जखम घेऊन हिंडतोय. ती भरावी म्हणून प्रयत्न नाही काही नाही. कशाला भरायला पाहिजे ? ज्या वेळेला जसा वारा वाहत असतो त्या प्रमाणे माझ्या विचारांची दिशा बदलत असते. कारण जखम भरावी म्हणून थोडे का प्रयत्न केले ? आणि जेव्हा जखम भरली नाही तेव्हा कशाला भरायची आहे म्हणून मी वैतागानं म्हणतो की, मी तसा प्रयत्नच करीत नाही. खरं म्हणजे करतो...

आता कळलं ना मला दुःख काय आहे ते ? माझी बायको वारली आहे आणि तिची आठवण मला डाचतीय...हो, अगदी सामान्यच आहे हे दुःख. म्हणजे तसं 'कॉमन' आहे. वेगळं नाही. पण मला ते वेगळंच आहे. कौतुक होतंय त्या दुःखाचं ! सगळीकडं गेलो की म्हणतात, "ती गेली जिवानिशी आणि हा भोगतोय बिचारा." कौतुक होतंय म्हणूनच मी पण करतोय ! सगळ्या माणसांना सांगून ! लहान मुलांनी वेडंवाकडं अक्षर काढलं की, मोठी माणसं त्याच्यावर आपला हात फिरवून ते ठळक करतात. त्याचं वेडंविद्रं अक्षर झाकून टाकतात. मी पण तसंच करतोय ! माझ्या वेड्यावाकड्या मनावर दुसऱ्यांची सहानुभूती मिळवून ते वेडविद्रं मन झाकायचा प्रयत्न करतोय...पण ते माझ्यापासून लपलं जात नाही. वेदनेची कैद सुटत

नाही. वेदनेची कैद भोगतोय. त्याच्यापासून मला या जन्मी सुटका मिळणार नाही. मला सर्वांगानं वेढून टाकलंय त्या वेदनेनं.

कशी होती दया ? अगदी दयेसारखी. म्हणजे 'दया' या अमूर्त गोष्टीची जर मूर्ती कोणी करील ना ? तर ती माझ्या दयेचीच होईल. तिचं नाक जरा जाडच होतं ! ओठसुद्धा खूप सुंदर नव्हते ! जरा फिक्कटच होते. पण केसांची ठेवण मोहिरपी होती आणि रुंद कपाळाखाली डोळे अतिशय सात्त्विक होते. म्हणजे मला नेमकं कसं ते नाही सांगता येत. पण...त्या डोळ्यांकडं पाहताना निळ्या ट्यूबलाईटचा शांतपणा जाणवायचा. साध्या दिव्याचा भगभगीतपणा तिथं नव्हता. रंग सावळा. माझीच बायको आहे म्हणून नाहीतर इतरांना मी काळाच म्हटलं असतं. ही छोटी दया झोपली ना की मग तिच्या चेहऱ्याकडं पाहताना हे आठवणीचे पडदे सरकायला लागतात. नको होतं....ती आठ वाजताच झोपायला लागते आणि मग... माझं डोकंच तडकतं ! म्हणून कालच तिला सांगितलंय की, १० वाजेपर्यंत अभ्यास करायचा ! मग आठ ते दहा तिला जागं ठेवायची खटपट चाललेली असते...उगीच त्रास देतो तिला...हं, उगीच कसला तिच्या बापाला शंभर रुपये पाठवतो दरमहा आणि आता ती कायद्यानं माझी आहे. मी कसाही वागेन तिच्याशी.

"दये ..." माझी हाक ! कधी विशेष मी तिला हाक मारत नाही म्हणून आनंदली आहे पोरगी.

"काय भैय्याजी ?" फ्रॉक उडवीत, नाचत, गोड हासत माझ्याजवळ येते.

"दये...का आलीस माझ्याकडे...मी वाईट आहे ग ?"

"अं...?" काहीही न समजल्याचा भाव !

"दये...आधी गेलीस सोडून मला आणि आता आलीस ती अशी...बालरूपानं ...काय साधलंस ? माझी वेदना कमी करण्यासाठी आणली तुला आणि तू आल्यापासून दुपटीनं वाढली....दये...दये...का केलंस असं ?"

"पुन्हा नाही करणार...." दया पुटपुटली.... मी एकदम भानावर आलो डोळे एकदम तिच्यावर विसावले..." तुला नाही म्हटलं राजा."

"मग ?" तिने आश्चर्यचकित होऊन विचारले.

"माझ्या बायकोला..."

"कुठं आहे ती ?"


"वारली..." मी उद्‌गारलो आणि तिच्या डोक्यावर टपली मारून म्हटले, "जा आता खेळायला...ती निघून गेली पण खरं तिच्या मनात नव्हतं. ती सारखी मागे वळून पाहत होती. तसेच, तसेच दयेचे स्नेहाळ आणि सात्त्विक डोळे. बाहेर जाता जाता तिने परत माझ्याकडे पाहिले आणि मग मला हसल्याशिवाय राहवेना ! मी अगदी मनमोकळा हसलो. त्याबरोबर तिने धावत येऊन मला मिठी मारली. मी तिच्या डोक्यावर हात फिरवून तिच्या केसांचं चुंबन घेतलं.

आणि मग थोड्याच वेळात आम्ही दोघं बाहेर फिरायला गेलो. तिच्यासाठी कुठलं-तरी कार्टूनही पाहिलं वाटतं.

अशी ही दया. दोघीही सारख्यांच ! असल्या तरी त्रास, नसल्या तरी त्रासच. एका दयेसाठी दुसरी दया आणली आणि पहिलीची आठवण असह्य झाली. तू मला किंवा मी तुला कधीच सुख देऊ शकलो नाही. हिला पण मी पूर्ण सुख देऊ शकत नाही....तसंच जीवन चाललंय...वेदनेला घेऊन...तू नसल्याची वेदना आणि ही आल्यामुळे झालेली तुझ्या आठवणीची वेदना.

"नीट राहयचं हं....अभ्यास करायचा. नाताळच्या सुटीत मग आपण खूप हिंडू ह...आणि बघ डोळे पूस रडायचं नाही, बाईंचं ऐकायचं. मी आलो इकडं तर भेटेनच आणि पैसे जास्त लागले तर, ऑफीसला पत्र पाठव. पत्ता आहेच, जाऊ मी?" सुटी संपवून तिला परत बोर्डिंगमध्ये ठेवून द्यायची वेळ आहे. तिचे डोळे कोरडे व्हायलाच तयार नाहीत. पण मग शेवटी तिला तसंच सोडून मी निघून जातो. 'दया' नसल्यामुळं परत जखम वाहायला लागते. साऱ्या आयुष्यावर अभद्र रक्त पसरतं....वेदना ठुसठुसते...आणि 'दये'शिवाय एकटा...पोरका हिंडऽऽत राहतो....वेदनेच्या कैदेत.

□ □ □


बृहन्मुंबईकरिता वितरक :

मे. बी. जयंतीलाल ॲण्ड को., १५ मंगलदास रोड, मुंबई २

बृहन्मुंबईखेरीज महाराष्ट्रासाठी वितरक :

मे. वाय्. एस्. प्रभू ॲण्ड सन्स, १२ हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

# मेहदी बेन बारका

मोरोक्कोच्या स्वातंत्र्यसंग्रामातील एका अग्रणी वीराची अज्ञातवासातील ही कथा...

श्याम तारे

मोरोक्कोचे एक राष्ट्रीय पुढारी आणि मोरोक्को स्वातंत्र्यसंग्रामातील एक अग्रणी. मेहदी बेन बारका यांना फ्रेंच प्रदेशात पळवून नेण्यात आले. त्यानंतर ते कधीच दिसले नाहीत. त्यांचा खून करण्यात आला असावा, अशी खात्री होण्यासारखे अनेक दुवे आढळून आले आहेत.

एकामागून एक अशा अनेक व्यक्ती जगप्रसिद्ध साईन न्यायालयात ज्यूरी आणि न्यायाधीशांसमोर सादर होत होत्या. तीन आठवडे चालणार असणारी ही सुनावणी त्याहून दुपटीपेक्षाही जास्त वेळ घेईल असा अंदाज दिसू लागला होता. फ्रान्समधल्या अत्यंत महत्त्वाच्या खटल्यांमध्ये या खटल्याची गणना होणार होती.

ही त्यांपैकीच एक साक्ष...श्री. लेमारचंद यांची...श्री. लेमारचंद पिअेर हे गृहस्थ फ्रेंच संसदेचे एक द गॉलवादी सदस्य ह्या गृहस्थांची स्वतःची अशी एक हेर संघटना असून या संघटनेचे तमाम सदस्य संशयास्पद वागणुकीकरिता कुप्रसिद्ध अशा तऱ्हेचे लोक आहेत...ही संघटना यापूर्वी द गॉल यांच्या अल्जेरियाच्या स्वातंत्र्ययोजनेला शह देणाऱ्या मंडळींच्या Secret Army Organization या संघटनेला उलथून पाडण्याकरिता उपयोगात आणण्यात आली होती.

श्री. लेमारचंद यांना अनेक आरोपी आणि साक्षीदारांनी या खटल्यात ओढून आणले होते आणि सर्वांच्या मते श्री. लेमारचंद या सद्गृहस्थांनी या सर्व कार्यवाहीत सक्रिय भाग घेतला होता आणि त्यामागे त्यांच्या स्वतःच्या अशा काही अपेक्षा निश्चितपणे होत्या.



मोरोक्को – फ्रान्सची अस्मिता

'आपलं नाव ?'
'लेमारचंद पिअरे.'
'व्यवसाय ?'
'वकील...संसद सदस्य.'
'आरोपींपैकी आपण कुणाला ओळखता का ?'
'होय...लोपेस आणि फिगॉन यांना.'
'त्यांच्यापैकी कुणाशीही आपले काही नात्याचे संबंध आहेत का ?'
'नाहीत.'
'याशिवाय इतर काही निवेदन द्यायचं असेल तर ते आपण देऊ शकता.'

✠ ✠ ✠

मेहदी बेन बारका या मोरोक्कोमधील एका स्वातंत्र्यसैनिकाची ही गाथा आहे.

मेहदी बेन बारका यांना पळवून नेणारांना शासन व्हायचे तेव्हा होईल; पण सध्या तरी फ्रान्स आणि मोरोक्को या दोन्ही राष्ट्रांच्या राजकीय अस्मिता मात्र गुंतून पडल्या आहेत हे निश्चित! कारण नुकत्याच उजेडात आलेल्या माहितीवरून केवळ काही माथेफिरू दरोडेखोरांकडून मेहदी बेन बारका यांना पळविण्यात आले नसून राजकीय द्वेषातूनच ही घटना घडली असल्याचे प्रत्ययाला आहे आहे.

तडीला लागलेल्या या दोन पद्धतींपैकी पहिली मोरोक्कोची आहे. मेहदी बेन बारका हे या पद्धतीत सामावू शकले नाहीत असेच आज म्हणावे लागेल. नव्या

मोरोक्कन समाजाच्या निर्माणकार्याचे व्रत घेऊन हा खंदा वीर फ्रेंच शासना- विरुद्धच्या लढ्यामध्ये सामील झाला होता. मोरोक्कन स्वातंत्र्याविषयीच्या त्याच्या ज्वलंत कल्पना काही अंशी अशा होत्या :

१. चालू फ्रेंच राजवट ही पूर्ण, मोरोक्कन स्वातंत्र्यातच परिवर्तित व्हावी. विशेषाधिकारयुक्त अशा अल्पसत्ताक राज्यपद्धतीत तिचे रूपांतर होऊ नये.

२. स्वातंत्र्य हे पूर्वीच्या विशेषाधिकारांचे पुनरुज्जीवन न ठरता एका नव्या समाजाचे निर्माणसूत्र म्हणून मान्य व्हावे.

३. काही विशिष्ट वर्गांनाच मिळणाऱ्या सवलती सार्वत्रिक रीतीने लागू व्हाव्यात...स्वातंत्र्याने समाजात निर्माण केलेल्या प्रत्येक संधीचा फायदा सर्व थरांतील जनतेसाठी उपलब्ध करून दिला जावा.

४. वसाहतवादाचे उन्मूलन हे आधिपत्यापेक्षा आणि साधारण जनतेसाठी केवळ सूचक अशा आंतरराष्ट्रीय मान्यतेपेक्षा निश्चितच अधिक महत्त्वाचे आहे.

दलित समाजापैकी प्रत्येकाला जबाबदार आणि जागरूक नागरिकत्वाचा अधिकार मिळालाच पाहिजे, ही स्वातंत्र्याची किमान मूळ व्याख्या असावी असे मानणारां- पैकी मेहदी बेन बारका हे एक होते.

पण...

पण मोरोक्कन स्वातंत्र्यलढ्याची तीव्रता जाणून मोरोक्कोला स्वातंत्र्य सुपूर्त करतानाही धूर्त फ्रेंच सरकारने मादागास्कार इथे वनवासात असलेल्या मोहंमद पाचवे यांना मोरोक्कोच्या अधिपतिपदाची वस्त्रे बहाल केली. स्वातंत्र्यसंग्रामात अग्रभागी असणाऱ्या Istiqlal Independence Party ला डावलून फ्रेंच सरकारने ही जी योजना आखली तिला अर्थातच पुढील राजकीय कारणे होतीच.

१. या प्रकाराने मोहंमद पाचवे यांच्या हाती मोरोक्कोच्या जनतेचे आणि प्रदेशाचे सर्वाधिकार एकत्रित करण्यात आले होते.

२. सामान्य जनतेच्या दृष्टीने मोहंमद पाचवे हे सन्मान्य धर्मगुरु-धर्माधिकारी— असल्यामुळे त्यांना जनतेचा पाठिंबा आपसूकच लाभला होता. त्यांच्या सत्तेला आव्हान देणे यामुळे कुणालाही शक्यच नव्हते ही गोष्ट फ्रेंच राजवटीने बरोबर जोखली होती.

साहजिकच मोरोक्कोत अधिष्ठित झालेले हे नवे सरकार सामान्य जनतेच्या अंधविश्वासावर आधारलेले होते. शिवाय सरकारला आव्हान देणारी शक्ती अस्ति- त्वातच येणे शक्य नसल्याने शासन हे निरंकुश झाले असल्यास नवल नाहीच.

सुव्यवस्था राखण्यासाठी एक सशक्त असे पोलीसदल निर्माण करण्यात आले. अरब आणि आफ्रिकन सत्तास्पर्धांच्या राजकारणात अव्वल दर्जाचे स्थान मिळविण्यासाठी लष्कराची पुनर्रचना आणि अद्ययावत सुसज्जता यांवर भर देण्यात आला. त्याबरोबरच शासन, अंमलबजावणी आणि आंतरराष्ट्रीय व्यवहार या खात्यां-

तल्या सर्व महत्त्वाच्या जागांवर उच्चवर्णीय आणि विशेषाधिकारप्राप्त मंडळींची वर्णी लावण्यात आली. परिणामत: उच्चशिक्षण ही फक्त या मूठभर मंडळींच्याच अखत्यारात असणारी बाब ठरली गेली.

फ्रेंच सरकारचा हा धूर्त डाव आणि मोरोक्कोमध्ये चाललेल्या ह्या भ्रष्टाचारी प्रकारांमुळे मेहदी बेन बारका यांच्यासारख्या अस्सल स्वातंत्र्यसैनिकाचे रक्त खवळून उठले.

राष्ट्र हे धर्मासारखेच सामान्य जनतेच्या आकांक्षांपासून दूर असलेले केवळ ध्येय म्हणून न ठरता स्वयंपूर्ण, स्वयंसिद्ध आणि स्वयंशासित असे एक प्रभावी हत्यार ठरण्याऐवजी मोरोक्कोमधील पद्धती पुन्हा अठराव्या शतकातील युरोपीय वसाहतवादी प्रवृत्तींशी साधर्म्य दर्शवू लागली हे सुचिन्ह निश्चितच नव्हते.

ज्या संघटनेबरोबर प्राणपणाने लढा दिला ती Istiqlal Independance Party ही सुद्धा त्याच धर्माधिष्ठित राजसत्तेला केवळ अंधविश्वासावर पूर्ण पाठिंबा देत आहे असे आढळून आले तेव्हा मेहदी बेन बारका यांनी एक नवा पक्ष स्थापन केला. वसाहतवादाशी सर्वशक्तीनिशी टक्कर देऊन एक नवा मोरोक्कन समाज निर्माण करणे हे या पक्षाचे मुख्य उद्दिष्ट होते. मोरोक्कोमधील सुशिक्षित जनतेचा या पक्षाला पाठिंबा मिळायला मुळीच वेळ लागला नाही.

सत्ताधिष्ठित मंडळींना या पक्षाची वाढती लोकप्रियता जाचक ठरणे क्रमप्राप्तच होते. परिणामत: १९६४ मधील एका तथाकथित जुलै कटानंतर मेहदी बेन बारका यांना देहान्ताची शिक्षा फर्माविण्यात आली. मेहदी बेन बारका यांचे राजकीय निर्वासित म्हणून देशाबाहेर कार्य सुरू झाले नि सरकारी सूत्रांच्या हालचाली सुरू झाल्या. ज्या विद्यार्थी नेत्यांनी या शिक्षेविरुद्ध आवाज उठविला त्यांचे शिरकाण करण्यांत आले. अज्ञातवासाची सुरुवात अगोदरच झाली होती. त्याच दरम्यानची ही हकीकत. मेहदी बेन बारका हे त्या वेळी फ्रान्समध्ये होते.

बेन बारका खटल्यातील दोन मुख्य आरोपी अजूनपर्यंत न्यायालयासमोर आले नव्हते. त्यांपैकी जनरल औफकीर हे मोरोक्कोचे गृहमंत्री असून कर्नल द् लिमी हे मोरोक्कोच्या सुरक्षा दलाचे प्रमुख होते. दोघांनीही मेहदी बेन बारका यांना पळवून नेण्याच्या कटाशी आपला मुळीच संबंध नसल्याचे जाहीर केले असले तरी हे दोघेही या घटनेच्या दिवशी पॅरिसमध्ये हजर होते ही गोष्ट विसरता येण्यासारखी नाही. एवढेच नव्हे तर या घटनेनंतर काही दिवसांनी पुन्हा एकदा या दोघांनीही पॅरिसमध्ये मुक्काम ठोकला होता; आणि तोही या खटल्यातल्या एका प्रमुख आरोपीच्या घरीच. तेथे त्यांचा मुक्काम होता हेही आता सिद्ध झालेले आहे. ज्या इमारतीत मेहदी बेन बारका हे शेवटी दिसले होते त्या 'बॉव्साईख व्हिला' या इमारतीतही ही मंडळी आढळून आली होती.

फ्रान्सच्या परराष्ट्र हेर संघटनेचे प्रमुख जनरल जॅकिअर यांच्या, या घटनेनंतर

तीनच दिवसांनी काढलेल्या वक्तव्याप्रमाणे सांगायचे तर जनरल औफकीर आणि आणि कर्नल द्‌लिमी ह्या दोघांनाही फ्रेंच प्रदेशात सर्व दृष्टींनी कमालीची सुरक्षितता वाटण्याइतपत त्यांची तयारी झालेली होती. संबंध असे प्रस्थापित झाले होते. एवढेच नव्हे तर त्या वेळचे फ्रान्सचे गृहमंत्री आणि काही वरिष्ठ अधिकारी यांच्या स्वागतार्थ एक भोजनसमारंभही या दोघांनी आयोजित केला होता. हा भोजनसमारंभ मेहदी बेन बारका यांना पळवून नेण्याच्या तिसऱ्याच दिवशी पॅरिस-मध्ये घडून येत होता...' ...काही खुनी मंडळींबरोबर आज आपण भोजन करीत आहोत...' अशी कुजबूज ऐकू येऊनही काहीच घडू शकले नव्हते...फ्रान्सचे त्या वेळचे गृहमंत्री श्री. फ्रे यांचा खास दूत या समारंभाला हजर होता.

जनरल औफकीर आणि कर्नल द्‌ लिमी यांनी शांतपणे नि कुठलाही अडथळा न येता दुसऱ्या दिवशी फ्रान्स सोडला आणि त्यांच्याबरोबरच कटात सामील असणारी बॉव्‌साईख, पालिसे, ली नाय्‌ आणि इतर मंडळीही फ्रान्समधून सुखरूप बाहेर पडली.

फ्रान्सची स्वत:ची गुप्तहेरसंघटना आणि सुरक्षा दल यांमधील दुवा निखळल्या-मुळे किंवा या दोहोंमध्ये सुसंवाद राहू न शकल्यामुळे या घटनेला इतकी भरमसाट प्रसिद्धी मिळूनही आरोपींना सुखरूपपणे त्यांच्या स्वत:च्या अखत्यारांतल्या प्रदेशात—मोरोक्कोत—येण्यास फ्रान्स सरकार अडवणूक करू शकले नाही ही फ्रान्सच्या गुप्तहेर-संघटनेची शोकान्तिकाच होती म्हणायची.

मेहदी बेन बारका यांना पळवून नेण्याबद्दलच्या खटल्यात तडीला लागलेली दुसरी अस्मिता—प्रतिष्ठा—फ्रान्सची आहे.

पाचव्या लोकसत्ताक सरकारच्या अगोदर फ्रान्समध्ये केव्हाही एकाच खटल्यात इतक्या महत्त्वाच्या व्यक्तींना न्यायासनासमोर उभे राहावे लागलेले नाही. या वेळी मात्र उच्चपदस्थ दूत, अधिकारी आणि अत्यंत महत्त्वाच्या सरकारी गुप्तहेर खात्यातील व्यक्तींना न्यायासनासमोर यावे लागलेले आहे हे विशेष महत्त्वाचे !

फ्रान्सची परराष्ट्र हेरसंघटना (SDECE) चे हस्तक आणि फ्रान्सच्या सुप्रसिद्ध 'Brigade Mondaine' पोलिसदलाचा अधिकारीवर्ग ह्या मेहदी बेन बारका यांना पळवून नेण्यात सहभागी होता ही वस्तुस्थितीच अत्यंत बोलकी आहे.

फ्रान्सच्या या प्रकरणातील कार्यक्रमाचे दोन नमुने देता येतील :

१) SDECE या गुप्तचरसंघटनेचा एक हस्तक लोपेझ (Lopez) याचा उल्लेख लेमारचंद पिअेर यांच्या साक्षीत आला आहे. हा सतत मोरोक्कोमधील अधिकारी आणि मेहदी बेन बारका यांना पळवून नेणारी मंडळी यांच्याशी संपर्क साधीत होता.

२. मेहदी बेन बारका यांना पॅरिस शहराच्या मध्यवर्ती विभागात फ्रेंच पोलिसां-पैकी सौकॉन आणि व्हॉयरॉट या दोन अधिकाऱ्यांनी एका पोलीस गाडीत बसविले

होते. याच गाडीतून मेहदी बेन बारका यांना अगोदर निर्देश केलेल्या ' बॉव्साईख व्हिला 'मध्ये पोचवून देण्यात आले.

पण यापेक्षा पुढे जाऊन मेहदी बेन बारका यांच्या तज्ज्ञ कायदेपंडितांनी विचारलेल्या प्रश्नांना फ्रान्स सरकारजवळ काहीही उत्तरे असू शकत नाहीत.

हे प्रश्न असे :

इतका सबळ पुरावा असूनही मेहदी बेन बारका यांना पळवून नेल्यानंतर फ्रेंच पोलीस दल आणि खुद्द SDECE यांनी या कटात सामील असल्याबद्दलचा इन्कार खटला सुरू झाल्यानंतरही एक आठवडापर्यंत सुरू ठेवला. तो कशासाठी ?

जनरल औफकीर, कर्नल द्लिमी यांना आणि त्यांच्या फ्रेंच टोळीला फ्रान्स सरकारने अडवून का ठेवले नाही ?

खुद्द अध्यक्ष द गॉल यांनाही या घटनेची माहिती ताबडतोब पुरविली गेली नव्हती. असे का ?

असे दिसते की या सर्व गूढ प्रकरणाच्या उकलीचे रहस्य एकच असले पाहिजे आणि ते म्हणजे.. संदर्भ...संबंध...लागेबांधे.

संबंधांमध्ये संरक्षणाची बाब असतेच. संबंधांमध्ये गलिच्छ आणि बेकायदा कृतींवर पांघरूण घालण्याचे कलमही आवश्यकच असते, शिवाय संबंधांमुळे उज्ज्वल भविष्यकाळ आणि बढती यांचे मार्ग सुकर होतात ते निराळेच.

या लेखाच्या सुरुवातीला दिलेले श्री. लेमारचंद पिअेर यांची साक्ष आणि निवेदन आटोपल्यानंतर फ्रेंच गृहमंत्र्यांचे दुय्यम असलेले श्री. ऑबर्ट यांनी निवेदन दिले. बेन बारका यांना पॅरिस शहरात दोन पोलीस अधिकाऱ्यांच्या द्वारे अज्ञात स्थळी नेण्याची अनुमती श्री. ऑबर्ट यांनी दिली असा त्यांच्यावर आरोप होता. या दोन अधिकाऱ्यांपैकी एकाच्या निवेदनाप्रमाणे श्री. ऑबर्ट यांच्याकडून आलेल्या एका टेलिफोन संदेशाद्वारे या योजनेत भाग घेण्यास त्या अधिकाऱ्याला प्रवृत्त करण्यांत आले होते. म्हणजेच या अधिकाऱ्याला या सर्व बेकायदा योजनेची कल्पना होती. शिवाय वरिष्ठांकडून या घटनेबद्दलच्या संरक्षणाची काही ग्वाही मिळाल्याशिवाय ही कामगिरी पत्करण्यास हा अधिकारी विशेष तयार नव्हता.

या ठिकाणी लोपेझ या प्रमुख आरोपीचे एक फ्रेंच वाक्य मुळातूनच देणे आवश्यक ठरावे; कारण या वाक्याने फ्रान्सच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा या कटात हात असल्याचे स्पष्टच झाले होते.... ' Foccart est au parfum ' असे वाक्य. म्हणजे श्री. फोकार्ट या गृहस्थांना या योजनेची पूर्णपणे माहिती होती. श्री. फोकार्ट हे अध्यक्षांच्या निवासस्थानातील आफ्रिका आणि इतर संघटना या विषयाचे तज्ज्ञ होते इतके म्हटले म्हणजे या योजनेची पाळेमुळे कुठपर्यंत होती याची कल्पना येईल.

या ठिकाणी हेही नमूद करणे जरूर आहे की, सरकारच्या वरील सर्व अधिकारी

आणि उच्चपदस्थांनी या योजनची आपल्याला माहिती नव्हती आणि योजनेशी त्यांचा कुठलाही संबंध नव्हता अशी जाहीररीत्या निवेदने दिलेली होतीच.

श्री. फोकार्ट आणि श्री. ऑवर्ट यांच्यावरील आरोप पूर्णपणे सिद्ध होऊ शकले. श्री. लेमारचंद पिअेर यांना मात्र पूर्णपणे संशयातीत वागणूक नसल्यामुळे वकिलीची सनद गमवावी लागली आहे. पुढल्या निवडणुकीला कदाचित् त्यांना उभे राहता येणार नाही.

फ्रान्सच्या हेरसंघटनेचे आणि एकंदर शासनयंत्रणेचे पितळ असे का उघडे पडले यासाठी आणखीही एका दृष्टिकोनातून विचार करणे जरूर आहे.

फ्रान्सचे पोलीसदल आणि गुप्तचर विभाग यांच्या अधिकाऱ्यांनी न्यायासमोर दिलेल्या साक्षी नि निवेदन बघितली की एकाच फ्रेंच गृहखात्याच्या आधीन असलेल्या या दोन विभागांमधील दुरावा आणि विस्कळीतपणा बघून आश्चर्याचा धक्काच बसतो. कारण यांपैकी एकानेही, किमान आवश्यक असलेल्या, राष्ट्रासाटी किंवा खटल्यात अंतर्भूत असणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी सुरक्षापद्धतीचा अवलंब केलेला आढळला नाही.

विशेषत: लोपेझ हा आरोपी आणि SDECE मधील लोपेझचे अधिकारी ली रॉय यांच्या निवेदनानुसार मेहदी बेन बारका यांच्या फ्रान्समधील सर्व हालचालींची माहिती SDECE ला देण्यात आली होती. या माहितीचे नीट परिशीलन करण्यात यावे अशी सूचनाही देण्यात आली होती. पण ही सर्व माहिती SDECE च्या जनरल जॅकिअर आणि जनरल गिबॉड या दोन्ही प्रमुखांना मुळीच महत्त्वाची वाटली नाही किंवा परिस्थितीशी सुसंगतही वाटू नये हे किती महत्त्वाचे आहे !

या दोन्हीही प्रमुखांनी ही माहिती प्रधानमंत्री किंवा गृहमंत्री यांच्यापर्यंत पोचू दिली नाही. मंत्रिमंडळ या प्रकाराबाबत पूर्णपणे अंधारात होते.

मेहदी बेन बारका यांच्या फ्रान्समधील प्रत्येक हालचालीबाबत संपूर्ण माहिती SDECE ला असूनही बेन बारका यांना संरक्षण देण्यात किंवा त्यांच्या हालचालींवर सुरक्षिततेसाठी नजर ठेवण्यास SDECE ही संघटना अपुरी पडली. निष्प्रभ ठरली. SDECE आणि पोलिसदल यांच्यातील हेवेदावे इतके वाढले होते की पोलिस-दलाला बेंन बारका यांच्या हालचालींची माहिती देणेही SDECE ला इष्ट वाटले नाही. वास्तविक बेन बारका यांना फ्रान्सच्या प्रदेशात संपूर्ण संरक्षण देण्याचे फ्रेंच पोलिसदलाचे कर्तव्य होते.

पण...

पण पोलिसदल आणि SDECE यांच्यामध्ये परंपरागत हेवेदावे आहेत आणि हीच गोष्ट, हेच अंतर्गत हेवेदावे फ्रान्सच्या या प्रकरणातील कमकुवतपणाचे निद-र्शक आहेत.

वाचकांना परिचित असलेल्या ००७ जेम्स बाँड या तथाकथित हेराच्या जीवनात

आलेल्या फ्रेंच हेरांची या आजच्या फ्रेंच हेरांशी तुलनाच होऊ शकत नाही. या हेरांपैकी बऱ्याच जणांना कायमचा डोकेदुखीचा विकार आहे तर काही अत्यंत महत्त्वाच्या कामगिरीवर पाठविण्यात आलेल्या हेरांची स्मरणशक्ती अतिशय कमी.

बेन बारका प्रकरणाशी संबंधित असलेल्या कामगिरीवर असताना ज्या लोकांमध्ये वावरण्याचा त्यांच्यावर प्रसंग आला त्यांचे साधे वर्णनदेखील या हेरांना नीटपणे करता आले नाही. जेम्स बाँडच्या फ्रेंच साथीदारांशी तुलना करताना वृत्तपत्रांनी या नव्या हेरांना ' मिनि-बाँडस् ' (Mini-Bonds) असे कुचेष्टेने संबोधले होते. फ्रान्सच्या हेरसंघटनेच्या प्रमुखांना त्यांच्या विभागाच्या खास कामगिरीबद्दल वरील संदर्भात विचारण्यात आले तेव्हा ' राष्ट्रीय सुरक्षितते'च्या बुरख्याखाली प्रश्नाचे उत्तर टाळण्यात आले होते.

खुद्द अध्यक्ष द गॉल यांनाही गृहखात्याच्या या अकार्यक्षमतेबद्दल आणि परंपरागत चालत आलेल्या जुनाट अंतर्गत सुरक्षा पद्धतीबद्दल कल्पना देण्यात आली होती असे वाटते. कारण SDECE च्या संपूर्ण पुनर्रचनेबद्दल त्यांनी दिलेले आदेश या प्रकरणानंतर ताबडतोब अमलात आणले गेले. जनरल जॅकिअर आणि श्री. फ्रे यांना त्यांच्या खात्यातून मुक्त करण्यात आले.

पण हे सर्व घडले ते मात्र मेहदी बेन बारका यांना पळवून नेण्याच्या घटनेनंतरच. त्यानंतर ते पुन्हा कधीही दिसले नाहीत.

तब्बल सहा आठवडेपर्यन्त आरोपींची अगणित निवेदने आणि साक्षीपुरावे या न्यायासनासमोर सादर करण्यात आले. प्रत्येक लहानसहान बाबीबद्दलची कायदेपंडितांची उलटतपासणी आणि समग्र फ्रान्स राष्ट्राला या खटल्याबद्दल लागलेली उत्सुकता यांमुळे खटला रंगणार असा रंग दिसू लागला होता. शिवाय फ्रान्समधील सर्व प्रमुख वृत्तपत्रांनी या खटल्याला जी अभूतपूर्व प्रसिद्धी दिली ती निराळीच !

पण याहीपेक्षा खटल्याची काटेकोर आणि निःपक्षपाती तपासणी आणि प्रत्येक पुराव्याची कसून उलटतपासणी करण्याचे जे आदेश अध्यक्ष द गॉल यांनी दिले आणि ज्या वातावरणात खटला चालविला गेला ते वातावरण अध्यक्षांनी मेहदी बेन बारका यांच्या मातोश्रींना दिलेल्या वचनाशी पूर्णपणे सुसंगत असेच होते हे कबूल करावे लागेल.

या दरम्यान मेहदी बेन बारका यांना पळवून नेल्यानंतर त्यांचा खून करण्यात आला असल्याचेही गृहीत धरायला आज हरकत नाही. त्यांच्या खुनाचा खटलाही आज ना उद्या न्यायासनासमोर येईलच. त्यामधून फ्रान्स नि मोरोक्कोच्या राजकारणावर आणखी प्रकाश पडेल असे म्हणायलाही हरकत नाही. कारण अखेर संबंध हा या प्रकरणातला दुवा म्हणून मान्य झालाच आहे. नाही का ?

□ □ □

## अंधार-उजेड

# सौ भा ग्य



### दोन अभिप्राय : एक प्रतिक्रिया

एक प्रेमी युगुल. त्यातल्या मुलीचे इच्छेविरुद्ध दुसऱ्याच लंगड्याशी लग्न. तो लंगडाही बेटा अफलातून 'हीरो' निघतो. नाटककाराच्याच शब्दांत सांगायचे झाले तर तो दिसतो तसा नसतो आणि नाही तसा दिसतो. मग पतिधर्म पाळण्यात त्याची रामाशी आणि पत्नीधर्म पाळण्यात या स्त्रीची सीतेशी रेस. अगदी घोडदौड रेस. मध्ये मध्ये मद्रासी-हिंदी सिनेमासारखेच एक म्हातारे कम् विश्वासू कम् विनोदी पात्र येते-जाते. पात्रांच्या तोंडातून फटाक्याच्या लडीसारख्या सुभाषितांच्या लडी सुटतात. शेवटी लेखकाच्या कृपेने हे जोडपे जिंकते. प्रथम मोडलेल्या युगुलातल्या पुरुषाचेही लग्न होते आणि शेवटी सर्वांचा एक ग्रुप फोटो होऊन सर्व सुखाने नांदू लागतात आणि नाटक संपते.

ता. २८ ऑगस्टला पुण्याला 'कलावैभव' या संस्थेने केलेल्या 'सौभाग्य' या नाटकाचे हे कथानक. लेखक श्री. पु. भा. भावे. कथानकाचा साचा इतका ठरीव आहे की खटकेबाज संवाद, चमकदार दिग्दर्शन, नावाजलेला नटवर्ग आणि वाखाणण्याजोगे संघसहकार्य (टीमवर्क, नटसंच व्यावसायिक असूनसुद्धा) इतक्या सगळ्या गोष्टी जमेच्या बाजूला असूनसुद्धा नाटक संपेपर्यंत सुबुद्ध प्रेक्षक तरी थोडाफार कंटाळला.

प्रा. मधुकर तोरडमल यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केले होते. त्यांच्या नाटकाची निवड साधारण ठरलेली असते. त्यात काहीतरी नवीन असते, पण नवे म्हणून अगम्य किंवा गूढ असत नाही. शेवटच्या प्रेक्षकापर्यंत सरळ शब्दरूपाने जाऊन पोहोचेल इतके उघड असते. तोरडमलांचे नाटक पाहताना नेहमी असे वाटते की हा एवढा दमदार दिग्दर्शक जास्त अवघड नाटक का निवडीत नाही? पण या वेळेस त्यांनी नाटकाच्या निवडीबाबत हेही समाधान मिळू दिलेले नाही. दिग्दर्शनाची बाकी अंगे मात्र चमकदार होती. पात्रयोजना अतिशय अनुकूल केली होती. गायनात जशा 'जागा घेतात' तशा त्यांनी दोन-तीन ठिकाणी हार, सिग्रेट इत्यादींना प्रतीकात्म रूपे देऊन 'जागा घेतल्या.' दिग्दर्शनकौशल्य दाखविण्याच्या काही युक्त्या एवढेच त्याचे महत्त्व असले तरी त्या जागा सुंदर होत्या. दिग्दर्शक म्हणून त्यांचे सर्वांत मोठे यश संघसहकार्य मिळवण्यात आहे. हमखास टाळ्या घेणारी वाक्ये या नाटकात जागोजागी आहेत. त्यामुळे नाटकाचा भडक मेलोड्रामा

सहज करता आला असता. पण त्यांनी फक्त मेलोड्रामापर्यंतच पाऊल उचलले आहे. जागोजागी हा संशय दिसून येत होता.

अभिनयात कोणीही कमी पडले नाही. विमलचे काम भावना या नटीने केले होते. त्यांनी भूमिका नीट जाणून घेऊन केली. त्यांच्या अभिनयाला फिल्मी पॉलिश आहे. पण ते पॉलिशच राहते आणि मूळ अभिनय खाऊन टाकीत नाही तोपर्यंत तक्रार करण्याचे कारण नाही. पायाने लंगड्या, पण मनाने उमद्या विमलच्या नवऱ्याचे, अनंतरावाचे, काम श्री. कमलाकर टाकळकर यांनी केले होते. निश्चयीपणा दाखविण्यासाठी कमी पण जोरदार हालचाली करण्याचे तंत्र त्यांनी वापरले होते, त्यात ते यशस्वी झाले. प्रेमी युगुलातला प्रियकर प्राध्यापक अविनाश ही भूमिका श्री. नरेन चव्हाण यांनी केली होती. ती त्यांनी ठाकठीक केली. एका स्त्रीशी प्रेयसी व दुसऱ्याची पत्नी म्हणून वागणे यात केवढे तरी विरोधात्मक नाट्य दडले आहे. लेखकाने त्यात हळुवारपणा ठेवला नाही हा नटांचा दोष नाही; पण तरीही असे वाटत राहिले, की भूमिका कुठे 'अंडरटोन' करायची व कुठे 'लाऊड' करायची याचा काहीसा संभ्रम त्यांना पडला असावा. घरातला खमंग कम् विनोदी कम् व्यवहारी कम् अनुभवी गोपूमामा प्रा. मधुकर तोरडमलांनी स्वत: केला होता. एक अगदी वेगळी भूमिका. तोरडमल फार पूर्वी विद्यार्थिदशेत विनोदी भूमिका हातखंडा करीत असत, हे कोणाला फारसे माहीत नसेल. तिथपासून त्यांच्या अभिनयाचा लंबक गंभीर भूमिकांच्या दुसऱ्या टोकाला पोहोचला होता. या वेळेस, हसवणारा असला तरी विदूषक नाही, गंभीर असला तरी रडका नाही असा गोपूमामा त्यांनी उभा केला. तो नक्कीच हृद्य होता. बाकी भूमिका, कृष्णराव : दीनानाथ लाड, राधाबाई : मंगला पर्वते, सरल : शीला वालावलकर, अष्टपुत्रे : शशिकांत महाडिक यांच्या होत्या. त्या चांगल्या झाल्या.

नेपथ्याच्या क्षेत्रात श्री. सखाराम भावे यांनी जॅक नाईफ नेपथ्याचा नवीन प्रयोग केला आहे. रंगमचाच्या दोन भागांत दोन सेट्स् लावून ते आळीपाळीने पुढे आणावयाचे व मध्ये एकदा मधला भाग तिसरा सेट म्हणून वापरावयाचा असा हा प्रकार आहे. त्यात सेट्स् हलवून पुढे आणणे एवढाच काय तो प्रयोगाचा भाग; नाहीतर, जोपर्यंत एका वेळेस रंगभूमीचा अर्धा किंवा एकतृतीयांशच भाग वापरला जात आहे तोपर्यंत, पूर्वीच्या एकाच रंगमंचावर दोन सेट्स् लावण्याच्या पद्धतीपेक्षा यात काही फारसा फायदा नाही. सेट्स् हालवून क्लोजअपचा परिणाम साधण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. पण त्यास त्यांनी प्रयोग म्हणण्याचे कारण नाही. 'डॉ. लागू' या आचार्य अत्र्यांच्या नाटकात हे तंत्र मागेच वापरलेले आहे. या तथाकथित प्रयोगाचा एक मात्र फायदा आहे की त्यामुळे नाटकावर बसलेला, 'एक अंक एक प्रवेश' हा कृत्रिम पोलादी पंजा निघण्यास मदत होईल. त्या दृष्टीने या प्रयोगाचे स्वागत व्हावयास पाहिजे.

रशियन राज्यक्रांतीविषयी प्रचारात्मक साहित्य विपुल आहे. उजेडात आलेल्या नवीन माहितीच्या आधारे लिहिलेला मराठीतील हा मात्र एकमेव ग्रंथ आहे.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

प्रस्तावना : ना. ग. गोरे

लेखक : वि. स. वाळिंबे

मूल्य : अठरा रुपये

राजहंस प्रकाशन : १०२५ सदाशिव पेठ : पुणे ३०.



। भावना । कमलाकर टाकळकर ।

पार्श्वसंगीत श्री. भालचंद्र पेंढारकरांचे होते. ते खास फिल्मी ढंगाचे वाटले. अशासाठी की नाटकात ते एकरूप कधीच झाले नाहीत. दरवेळेस स्वतःला प्रेक्षकांच्या डोक्यावर मारीत राहिले. त्यामुळे कधी कधी चांगले असून किंवा योग्य जागी असूनही त्यातून खास रसनिष्पत्ती झाली नाही. पात्रांच्या हालचालींतून निर्माण होणारे आवाज (इन्सिडेंटल साऊंड्स्) पार्श्वसंगीत म्हणून वापरता येतात. (उदा. पुण्याच्या 'महाराष्ट्रीय कलोपासक'चे राजा नातू ते वारंवार परिणामकारकरीत्या वापरतात). ही बाब व्यावसायिक मंडळी लक्षात घेतील तर बरे. ते जास्त नैसर्गिक असल्याने नाटकावर वाद्यांचे आक्रमण टाळता येईल.

प्रकाशयोजना श्री. बाबा पार्सेकरांची होती. ती वास्तव (रिॲलिस्टिक) असावी की स्वप्निल, इत्यादी तात्त्विक भानगडीत ते पडलेले दिसत नाहीत. नाटकाच्या एकूण मेलोड्रॅमॅटिक प्रकृतीशी मिळते जुळते घेण्याचे धोरण त्यांनी ठेवले असावे. ते धोरण मात्र त्यांनी तडीस नेले.

नाटक संपले. प्रेक्षक कोरे बाहेर पडले. मला मात्र वाईट वाटले, प्रा. मधुकर तोरडमल यांच्यासारखा समर्थ नट–दिग्दर्शक असले मद्रासी सिनेमे रंगभूमीवर आणण्याच्या वांझोट्या प्रयत्नात आकंठ डुबलेला पाहून!

— उल्हास लुकतुके

## २

# प्रिय तोरडमलजी

स्पष्ट सांगतो, तुम्ही माझी घोर निराशा केलीत. तुमचे 'काळें बेट लाल बत्ती' पाहिले तेव्हा तुमच्याविषयी इतक्या प्रचंड अपेक्षा आणि कल्पना करून ठेवल्या होत्या ! आताच तुमचे 'सौभाग्य' पाहिले, आणि ते पाहण्यासाठी हातचे काम बाजूला सारून, धडपड करून घालविलेला वेळ फुकट दवडला असे वाटायला लागले. माझ्यासारख्या तुमच्या असंख्य चहात्यांची प्रतिक्रिया तुमच्या कानांवर घातलीच पाहिजे, असे वाटले म्हणून लगेच लिहायला बसलो. तोरडमलजी, ह्या नाटकाचे दिग्दर्शन आणि एक भूमिका तुम्ही पत्करलीत, ती कुठल्या आकर्षणाने ? या नाटकाच्या कथेने तुमच्यावर कोणत्या कारणाने मोहिनी घातली ? मद्रासच्या आणि एकंदरीत सर्वच हिंदी चित्रपटांचा जसा फॉर्म्युला असतो, तशाच प्रकारचा साचा मराठी नाटकातही आहे, ही गोष्ट तुम्हांला मी सांगू नये. 'सौभाग्य'मध्ये तसाच फॉर्म्युला नाही का ?'

का हौशी रंगभूमीवरून व्यावसायिकांच्या कंपूत शिरण्याच्या घाईमुळे हे सामान्य नाटक तुम्ही जवळ केलेत ?

शप्पथ सांगतो, तीन तास संपून 'बालगंधर्व'च्या वातानुकूलित रंगमंदिराबाहेर केव्हा पडतो, असे झाले होते. इतके संथ आणि सामान्य नाटक हल्ली शाळा-कॉलेजची पोरंसुद्धा करीत नाहीत हो ! खरं सांगा, लग्नाआधी दुसऱ्यावर प्रेम करणारी व लग्नानंतर नवऱ्याच्या मोठेपणाने दिपून त्याची देवासारखी पूजा करणारी व प्रियकराला फटकवून लावणारी तरुणी तुम्ही आधी कमीत कमी ४-५ तरी नाटकांत पाहिली नाही का ? मग पु. भा. भावेंच्या दीर्घसूत्री रेंगाळणाऱ्या कथेसारखेच असलेले हे नाटक तुम्हांला आगळे का वाटावे ?

'सौभाग्य' पाहताना वाटत होते, आपण बाबूराव गोखले यांचे नाटक तर पाहत नाही ना !

नाटकातली सगळी मंडळी मातब्बर. त्यामुळे अभिनयाचा प्रश्न उद्‌भवतच नाही. राहता राहिले तुमचे दिग्दर्शनकौशल्य. पहिल्या अंकाचा पडदा उघडला तेव्हापासून शेवटी तो पडेपर्यंत एक दोन-चार अपवाद वगळता, तुमची स्वतःची चमक मला तरी कुठे दिसली नाही.

प्रथमपासून अखेरपर्यंत नाटक इतके संथ कसे हो ? 'काळेबेट' किंवा त्या आधीच्या 'सैनिक नावाचा माणूस' पाहिल्यापासून माझ्यासारखे तुमच्याकडून अपेक्षा करीत होते 'अॅक्शन'ची. इथे तर त्याचा पत्ताच नाही.

पहिल्या अंकातील अविनाश व विमल यांच्यांतील कूजन किंवा निर्भर्त्सना आणि आई व बाबा यांच्यांतील बोलणे इतके कंटाळवाणे झाले ! कागदाचा कपटा न्

कपटा बाहेर फेकणारे जोशी अविनाश-विमलचे गुलाबपुष्प तसेच जमिनीवर पडू देतात, त्याच्या बाजूने संतरंजी अंथरतात, त्याला ओलांडून जातात, हे कसे ?

दुसऱ्या अंकात लग्नानंतरची विमलची कुचंबणा, दादासाहेबांचा मोठेपणा, मामाचा खवचटपणा यातून कथा पुढे सरकते की नाही याविषयी संभ्रम पडायला लागला. गावातला गुंड तुमच्या नायकाकडून पैसे घेऊन त्याच्याच घरात त्याच्याच मामासमोर आचरटासारखे बोलतो, हे शक्य आहे का ? पूज्य दादासाहेब, प्राचार्य, मामा विमल यांच्यासमोर सरल इतक्या लाडिकपणे प्रेमावर कशी बोलू शकते ?

शेवटच्या अंकात गल्लाभरू हिंदी चित्रपटांत करतात तसा धीरोदात्त नायकावर गावगुंडांनी केलेला हल्ला आवश्यक नि सयुक्तिक आहे का ? पहिल्या अंकात सद्वर्तनी, वास्तववादी तत्त्व उराशी घेऊन प्रेयसीला पळून जाण्याऐवजी श्रीमंत दादासाहेबाशी लग्न करायला सांगणारा अविनाश तिसऱ्या अंकात इतका नीचपणा कसा दाखवू लागतो ? त्याला दादासाहेबांच्या मानलेल्या बहिणीच्या मुलीशी लग्न अथवा प्रेम करायची इच्छासुद्धा नव्हती तर तो तिच्याशी इतक्या लाडिकपणे का वागतो ? ज्या मानलेल्या भावाच्या सुखासाठी अहिल्या बदनामी नि मनस्ताप सहन करते, त्याच्या इच्छेला डावलून ती तीर्थक्षेत्री निघून जाते, हे फॅड तुमच्या नाटकात दिसूच कसे शकते ?

तुमचा इंद्रसेन पाहिला, आता ' मामा ' पाहिला. खरं म्हणजे तुम्ही आम्हांला ' मामा ' केला. पदोपदी मधुसूदन कालेलकरी नाटकात शरद तळवलकर काम करीत आहेत असे वाटत होते.

कदाचित हे नाटकही रौप्य, सुवर्ण, शतक महोत्सव साजरे करील. मुंबई-पुण्याबाहेरच्या दौऱ्यावर तुमचे प्रयोग हाउसफुल्ल जातील. बायाबापड्यांच्या डोळ्यांत तुम्ही पाणी उभं करू शकाल.

पण ते कुणीही अलवत्या-गलबत्या करू शकेल. तुमच्याकडून अपेक्षा होती, ती याची नव्हे.

प्रयोगाच्या उणीवा सांगितल्या. काही चांगल्या बाबीही मोकळेपणाने सांगितल्या पाहिजेत. काही ठिकाणचे संवाद पब्लिकला खुष करीत होते, काही ठिकाणी हृदयस्पर्शीही होते. भालचन्द्र पेंढारकरांचे पार्श्वसंगीत सुरेख होते. प्रकाशयोजना व्यवस्थित होती.

आणि मुख्य जमेची बाजू म्हणजे सखाराम भावे यांचा ' जॅक नाईफ ' रंगमंच. ही कल्पना त्यांची स्वतःची असेल तर त्यांचे कौतुक केले पाहिजे. आमच्याकडेही टॅलेंट आहे, याचा हा पुरावा. फक्त हे टॅलेंट अशा ' सौभाग्य'च्या वाट्याला आले, हे त्या सखाराम भावे यांचे दुर्भाग्य.

बाकी काय ? आनंद सगळा !

आपला चाहता,

**किरण ठाकूर**

१३ सप्टेंबर १९६९




एन्. सी. चौधरी म्हणतात, "आजारी पडल्यामुळं ता. १८ ऑक्टोबरला जनरल कौल दिल्लीला गेले, यात अनुचित असं काहीच घडलं नाही, हे मला स्पष्टपणं सांगितलंच पाहिजे. आघाडीवरच्या परिस्थितीत त्यामुळं काहीच फरक पडणार नव्हता. ता. २० ऑक्टोबरला चिनी जबरदस्त हल्ला चढवतील याची त्यांना कल्पना नसणार. आपण तर चिन्यांवर हल्ला करणार नव्हतोच. आघाडी सोडून जनरल कौल मागं गेले ही त्यांची चूक आहे असं म्हणत असाल तर हे उदाहरण बघा की, ता. २३ सप्टेंबर १९४२ ला युद्ध जवळ आलेलं असताना रोमेल आजारी पडल्यामुळं औषधोपचारासाठी जर्मनीला परत गेला आणि बरा झाल्यावर पुन्हा आघाडीवर आला. जनरल कौलनी आघाडी सोडली असं म्हणणं म्हणजे फक्त त्यांची निंदा करण्यासारखं आहे दुसरं काही नाही."

जनरल कौलना निर्दोष ठरवीत असताना श्री. चौधरी यांची पंचाईत झाली असावी. कारण जनरल कौल खरोखरीच आजारी होते की नाही हे महत्त्वाचे नसून त्यांचे आजारपण आणि अचानक बरे होणे याचा भारतीय लष्करात झालेला विपरीत परिणाम हा महत्वाचा आहे. कदाचित त्या विपरीत परिणामांची माहिती श्री. चौधरी यांना नसावी.

सतत दोन वर्षे मर्दुमकी गाजवून मग रोमेल आजारी पडला, तर आघाडीवर आल्यावर न लढताच फक्त तेरा दिवसांत जनरल कौल आजारी पडले. ब्रिटिशांच्या अंगावर धावून जाण्यासाठी रोमेलने पुन्हा एकदा आघाडीची सूत्रे घेतली तर तावांगमध्ये घुसून चिनी शांतपणे ठाण मांडून बसलेले असताना जनरल कौलनी पुन्हा एकदा

रजपूत तुकडीचे लेफ्टनंट कर्नल रीख यांचे ता. १९ ऑक्टोबरचे शब्द आठवतात– "चिन्यांची तयारी कितीही चांगली असली तरी राजपूत तुम्हांला आणि देशाला मान खाली घालायला लावणार नाहीत. अखेरचा क्षण येईपर्यंत आम्ही लढू. जर जगून वाचून तुम्ही परत गेलात तर ज्या गुन्हेगारांनी हा लढाईचा विचका करून टाकला आहे, त्यांना योग्य ते शासन दिले जाईल अशी व्यवस्था करा ..."

लेखक .................... ब्रिगेडिअर जे. पी. दळवी

अनुवाद .................... अॅडव्होकेट माधव कानिटकर

लेखांक .................... चोवीस

सूत्रे घेतली. जर्मनीला जाताना रोमेलने जनरल स्टमे (Stumme) ला संपूर्ण अधिकार आणि काही स्वच्छ आणि स्पष्ट हुकूम दिले होते. पुढे हा जनरल स्टमे (Stumme) हार्ट अॅटॅकने मेला. ताबडतोब त्याच दिवशी ता. २४ ऑक्टोबर १९४२ ला जनरल Ritter Von Thoma हा सर्व सत्ता असलेला कमांडर बनला. पाहिलंत कशी व्यवस्था होती जर्मनांची ? रोमेल आजारी पडला म्हणून जर्मन सैन्यात शंका-कुशंका आणि खळबळ माजली नाही. रोमेल तर आता आजारी पडला. आता हुकूम देणार कोण ? म्हणून जर्मन सैनिक एकमेकांच्या तोंडाकडे पाहत बसले नाहीत. कारण आघाडीवर कुणीना कुणी तरी सर्वाधिकारी कमांडर सतत होताच, हा महत्त्वाचा मुद्दा आहे.

या सर्व प्रकरणात दोन धडे घेण्यासारखे आहेत. एक तर कमांडरदेखील आजारी पडू शकतो. कल्पना नसताना तो अचानक मरू शकतो आणि दुसरा म्हणजे हे लक्षात ठेवून की, हा 'गेला' तर काय करायचे, याचा विचार प्रमुख व्यक्तींनी अगोदरच करून ठेवायचा असतो.

राजकीय क्षेत्रात धडा हा शिकायचा की सत्य डोळ्यांसमोर ठेवून कमांडरची निवड, नेमणूक आणि बदली वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातूनच झाली पाहिजे. संरक्षण-मंत्री मेनन आणि सेनापती थापर या दोघांना ता. १८ ऑक्टोबरला जनरल कौल आजारी पडल्यामुळे त्यांना दिल्लीला आणले गेले हे ठाऊक होते. त्यातून अनेक प्रश्न उपस्थित होतात. जनरल कौल यांच्या अनुपस्थितीत त्यांच्यानंतर असलेले अनुभवी जनरल प्रसाद यांची कोअर कमांडर म्हणून का नेमणूक केली गेली नाही ? कुठलाही

निणय घेण्यापूर्वी जनरल प्रसादना जनरल कौल यांच्या ब्रिगेडिअर स्टाफ ऑफिसरचा सल्ला का घ्यावा लागत होता ? जनरल साध्या ब्रिगेडिअरचा सल्ला घेतो,? त्यांची स्वत:ची अस्मिता आणि धैर्य का लुप्त झाले ? का दाबून टाकण्यात आले ? ब्रिगेडिअर स्टाफ ऑफिसरला तरी जनरल कौल यांचा सल्ला का घ्यावा लागला ? ४ थ्या कोअरचे हेडक्वार्टर काय करीत होते ? चिन्यांच्या दैनंदिन जय्यत तयारीचा रिपोर्ट जनरल कौलना देत होते की नाही ? जनरल कौलना हा रिपोर्ट जात नव्हता, तर तो कुणाला जात होता ? हे दैनदिन रिपोर्टस् वाचूनदेखील उच्च पातळीवर असलेल्या व्यक्तींना असे वाटले का की ४ थ्या कोअरला कमांडरची जरुरी नाही ? एकदा का जनरल कौल यांची अनुपस्थिती गृहीत धरली गेली होती तर सांगलेजवळच्या तळचातल्या बर्फाची उंची मोजण्यासंबंधी निर्णय कुणी घेतला ? ता. १९ ऑक्टोबरला सांगले या ठिकाणी गुरखा जवान पाठविण्याचा हुकूम कुणी दिला ? चिनी १–२ दिवसांत नामका-चू परिसरात संरक्षण करीत असलेल्या आपल्या जवानांवर जोरदार हल्ला चढवितील याचा अंदाज असता तर असा हुकूम दिला गेला असता का ? प्रश्न अनेक आहेत पण दुर्दैवाने त्यांची उत्तरे मात्र मोजकीच आहेत. ता. १८–१९–२० ऑक्टोबर या आणीबाणीच्या तीन दिवशी जनरल कौलच्या अनुपस्थितीने बऱ्याच जबाबदार लोकांना पळवाटा सापडल्या आहेत. दिल्लीत असलेल्या जनरल कौलना आघाडीवरच्या जवानांबद्दल कळवळा येऊन फक्त सहानुभूती व्यक्त करता आली असती. जनरल सेन असे म्हणतात की, " कमांडर म्हणून जनरल कौल यांची नेमणूक झाल्यापासून माझा या युद्धाशी काहीच संबंध राहिला नाही." संरक्षणमंत्री मेनन असे म्हणाले की, " लष्कराच्या दैनंदिन हालचालींत मी कधीही हस्तक्षेप केलेला नाही !" जनरल प्रसाद तर त्यांना कमांडर म्हणून मान्यता न दिली गेल्यामुळे अगतिक झालेले. मग मृतवत् झालेल्या थाग-ला प्रदेशाच्या नावाने ता. १९ ऑक्टोबर १९६२ ला कमांड होती तरी कुणाची ?

जनरल कौल यांच्या अनुपस्थितीत ताबडतोब दुसऱ्या कमांडरची नेमणूक न करणे ही संरक्षणमंत्री मेनन आणि आर्मी चीफ श्री. थापर यांची अक्षम्य चूक होय. आपल्या जवानांसाठी चिनी तिकडे वधस्तंभ बांधीत होते तेव्हा इकडे जनरल कौलची शारीरिक तपासणी चालू होती. चिनी युद्ध करतील अशी भारत सरकारला कल्पनाच नव्हती. भारत सरकारची धरसोड वृत्ती आणि भारताच्या एका संपूर्ण ब्रिगेडचा विध्वंस करून टाकू शकणारी चिन्यांची बळकट व्यूहरचना अशा दोन डगरींवर पाय ठेवल्याने जनरल थापर तोंडघशी पडले आणि महत्त्वाचा मुद्दा असा की, राजकीय नेत्यांना या प्रकाराचे विशेष काहीच वाटले नाही. गाजावाजा करून जनरल कौलच्या झालेल्या नेमणुकीमुळे जनतेत अनेक आवाज उमटले पण लष्करी परिस्थितीचे ज्ञान असलेल्या लष्करी अधिकाऱ्यांची तिरपीट उडाली. जनरल कौल कदाचित खरोखरीच आजारी असतील; पण चिन्यांचा हल्ला होण्याच्या

ऐन वेळी त्यांचे आजारीपण आणि अचानक बदली यांमुळे त्यांच्या विरोधकांच्या हातात कोलीत मिळाले. त्यांच्या टीकारांचा गैरसमज झाला. जनरल कौल स्वतःच हे मान्य करतात आणि म्हणतात की, "त्याच वेळी मी असं ठरवलं होतं की एकवेळ आघाडीवर मेलो तरी चालेल पण नेतृत्व सोडायचं नाही." जनरल कौल यांचे हे उमदे विचार निश्चितच प्रशंसनीय आहेत; पण त्याचबरोबर ज्याच्या लष्करी कारकीर्दीवर जवानांचा पूर्ण विश्वास आहे आणि ज्याची तब्येत चांगली आहे अशाच जनरलने नेतृत्व करावे अशी मागणी करणे हा जवानांचा हक्क आहे.

ता. १९ ऑक्टोबरला मी आणि जनरल प्रसाद कुठल्या दुर्दैवी अपघातात सापडलो होतो, ता. २० ऑक्टोबरला बाकीचे गुरखा जवानदेखील सांगले या ठिकाणी पाठवून द्या हा हुकूम कुणी दिला, या बाबतीत जनरल कौल मूग गिळून स्वस्थ आहेत. त्यांचे हे मौन बरेच बोलके आहे आणि आपोआप काही गोष्टी सिद्ध करणारे आहे. आजारीपणामुळे दिल्लीत असलेले जनरल कौल तेझपूरला असलेल्या हेडक्वार्टरशी सतत संपर्क ठेवून होते; आणि त्यांचे B.G.S. ब्रिगेडिअर के. के. सिंग यांनी जनरल कौलना ता. २० ऑक्टोबरला सकाळी चिनी आक्रमणाची खबर दिली होती. अशा स्थितीत ता. १९ ऑक्टोबरला आघाडीवरचे वातावरण कसे तंग झालेले होते हे B. G. S. ने जनरल कौलना कळविले नव्हते या म्हणण्यावर कुणाचा विश्वास बसेल? कारण B. G. S. ने G. O. C. 4th डिव्हिजनला आश्वासन दिले होते की मी आघाडीवरची ही तंग परिस्थिती जनरल कौलना कळवतो. आपल्या 'अनटोल्ड स्टोरी' या पुस्तकात ता. १९ ऑक्टोबर या दिवशीची परिस्थिती कशी होती याचे वर्णन करताना जनरल कौलनी त्यांच्या नादुरुस्त तब्येतीचे वैद्यकीय निदान, आघाडीवर रस्ते नव्हते, डोंगराळ प्रदेशात उपयुक्त होऊ शकतील अशा जनावरांची कमतरता आणि चिन्यांनी त्यांच्या हद्दीत बांधून काढलेले उत्तम रस्ते यांचे सविस्तर वर्णन केलेले आहे. कमाल आहे की नाही? वस्तुतः जनरल कौल स्वतःच बॉर्डर रोडस् कमिटीचे कायम सभासद होते. QMG (क्वार्टर मास्टर जनरल) या नात्याने या आवश्यक त्या तयारीची जबाबदारी त्यांचीच होती. पण त्यांना असं भासवायचंय् की ता. १९ ऑक्टोबरला जी परिस्थिती निर्माण झाली होती त्याची जबाबदारी त्यांच्यावर नाही. त्यांच्या आजारीपणामुळे ते जबाबदारीतून मुक्त झाले! मग? ७ व्या पायदळ तुकडीचा धुव्वा का उडाला याचे एक्स्प्लनेशन द्यायचे कुणी? तर ब्रिगेड कमांडर जे. पी. दळवींनी!

ता. १८ ऑक्टोबरला दिल्लीला हलविण्यात आल्यानंतर आघाडीवर कुणीही ढवळाढवळ करू शकणार नाही अशा निर्वेध नेतृत्वाची योजना झालेली आहे की नाही, याची खात्री करून न घेणे ही जनरल कौल यांची पाचवी आणि अखेरची घोडचूक ठरली.

ता. १९ ऑक्टोबरला संध्याकाळी मला आणखी एक आकस्मिक धक्का बसला. एक

थकलेला आणि कंटाळलेला अधिकारी आघाडीवर आला. हे होते कॅप्टन हरजीतसिंग तलवार. फॉरवर्ड ऑब्झर्व्हेशन ऑफिसर. सांगले या ठिकाणी तोफखान्याची व्यवस्था त्यांनी पाहायची होती. मी सांगून कुणाचा विश्वास बसत नव्हता की सांगले ह्या ठिकाणावरून चिन्यांवर भडिमार करण्यात काही अर्थ नाही. कारण चिनी आपल्या तोफखान्याच्या पल्ल्याच्या पलीकडे आहेत. पण ऐकतो कोण ? कारण आपली योजना आखली गेली होती ती आसाम रायफल्सच्या लान्स नाईकने काढलेल्या नकाशावर आधारलेली ! त्याने सांगले हे ठिकाण एका कागदाच्या अगदी कोपऱ्यावर दाखविलेले आणि या नकाशाप्रमाणे चिनी आपल्या टप्प्यात येत होते !

हे कॅप्टन तलवार आणि त्यांच्याबरोबरचे जवान यांनी जन्मात कधी डोंगर कसा असतो तो पाहिलेला नव्हता. त्यांना आग्र्याहून एकदम आघाडीवर धाडण्यात आले होते ते एवढ्याचसाठी की, त्यांच्याकडे असलेल्या बंदुका आणि तोफाच फक्त काय त्या आपण सांगधर या ठिकाणी विमानातून खाली टाकू शकत होतो. आपण आपली स्वतःचीच कशी फसवणूक करून घेत होतो याचा हा पुरावा आहे.

सुदैवाने कॅप्टन तलवारसारख्या उमद्या तरुणाला मी ओळखत होतो. पुढे माझ्याबरोबर तोही चिन्यांचा कैदी बनला ! मी ज्या अग्निपरीक्षेची दुःखे भोगली ती त्यांनीसुद्धा भोगली ! असा माणूस त्या वेळी माझ्याबरोबर होता, याचा मला अभिमान वाटतो.

ता. १९ ऑक्टोबरला, या मनाच्या विफल आणि नाउमेद अवस्थेतली आता त्या दिवशीची एक शेवटची आठवण सांगतो. राजपूत तुकडीचे लेफ्टनंट कर्नल रीख यांनी मला चिन्यांच्या जमवाजमवीची संपूर्ण माहिती दिली. ते मला म्हणाले की, प्रत्येक कंपनी कमांडरला त्यांनी फोनवरून कळविलेले आहे की, " सावधान !

लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध !

डोंगरे बालामृत

के. टी. डोंगरे अॅण्ड कं. प्रा. लि. बम्बअी-१.

डोळ्यांत तेल घालून पहारा करा! पहारा वाढवा; आणि जर का चिम्यांनी हल्ला चढवलाच तर अखेरपर्यंत लढा." त्यांचे मला अखेरचे शब्द असे होते की, ' चिम्यांची तयारी जरी कितीही चांगली असली तरी राजपूत तुम्हांला आणि देशाला खाली मान घालायला लावणार नाहीत. आता लढण्यासारख काही उरलेले नाही, असा अखेरचा क्षण येईपर्यंत आम्ही लढू. जर का जगून वाचून जिवंत परत गेलात तर ज्या गुन्हेगारांनी ह्या लढाईचा विचका करून टाकला आहे त्यांना योग्य ते शासन दिलं जाईल अशी व्यवस्था करा!"

...... नेहमीप्रमाणे राजपूत शब्दाला जागले. त्यांच्या कमांडिंग ऑफिसरने सांगितल्याप्रमाणे त्याही बिकट परिस्थितीत अखेरपर्यंत ते शौर्याने लढले.

एके दिवशी रात्री झोपण्यापूर्वी माझी ब्रिगेड या सावळ्या गोंधळापासून वाचवण्यासाठी मी काय काय करू शकलो असतो याचेच चिंतन करीत होतो. ता. १० ऑक्टोबरपर्यंत माझ्यापेक्षा वरिष्ठ असलेल्या सर्व लष्करी अधिकाऱ्यांनी मला आश्वासन दिलं होतं की, आघाडीवर व्यक्तिशः येऊन आम्ही तुला भेटतो आणि त्यानंतर राजकीय घडामोडी आणि लष्करी विचारसरणी या बाबतीत फेरविचार करतो. वरिष्ठ अधिकाऱ्यांना साद्यंत परिस्थिती कळवून आघाडीचे स्पष्ट चित्र त्यांच्या डोळ्यासमोर ठेवणे हे ब्रिगेडिअर या नात्याने माझे कर्तव्य होतं. ते मी पार पाडले होते. निदान ता. १० ऑक्टोबरपर्यंत तरी यापेक्षा जास्त काही मी करू शकत नव्हतो.

ज्यांनी लष्करात काही वर्षे नोकरी केलेली आहे अशा प्रत्येक सैनिकालाच माझ्या भावना नीट समजू शकतील. ज्याला काही अंत नाही अशा तऱ्हेचे खटके वरिष्ठ व लष्करी अधिकाऱ्यांत आपसातच असताना, आपल्यावर टाकलेली जबाबदारी लष्करी दृष्टया आपण पार पाडू शकणार नाही अशी आपली स्वतःची खात्री पटली असताना, आपल्याला या जबाबदारीतून मुक्त करण्यात यावे असच प्रत्येक सैनिकाला वाटेल. मलाही त्या वेळी तसेच वाटत होते. राजकीय लढाई खेळणे ब्रिगेडिअरला कसे काय शक्य आहे?

त्या निर्णायक आणि खडतर वेळी मी अक्षरशः एकटा पडलो होतो. या एकटेपणाचा माझ्यावर परिणाम झाला होता. आपल्याला निश्चित स्वरूपाचा हुकूम द्यायलाच कुणी नाही अशी पोरकेपणाची भावना माझ्या मनात निर्माण झाली होती. ता. १० ऑक्टोबरनंतर मला सारखे असे वाटू लागले की, आपण राजीनामा द्यावा! तो प्रदेशदेखील असा होता की, झटकन एखादी जीप घेऊन माझ्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना मी भेटू शकत नव्हतो. कारण विमानाशिवाय दुसऱ्या कुठल्याही वाहनाने मी तिथून हलू शकत नव्हतो. ता. १३ ऑक्टोबरला

'नाम-का-चवरील सर्व पुलांचे संरक्षण करा' हा हुकूम मी स्वीकारायला नको होता. पण काय करणार? एक वेळ मरून जाण्याचा धोका स्वीकारणे पत्करले पण 'हा भ्याड होता' असे कुणी म्हणता कामा नये, म्हणून मी तो स्वीकारला. जिथे देवदूत पाऊल टाकायला घाबरतात तिथे सैतान सहज नंगानाच करू शकतो असं म्हटलंय ते यासाठीच!

मी ठरवले की, ज्या जवानांनी निष्ठेने आजपर्यंत माझी पाठराखण केली आहे त्यांना सोडून जायचे नाही. माझेदेखील त्यांच्यासाठी म्हणून काही कर्तव्य होते. 'मरू देत जवान!' असे म्हणून त्यांना सोडून जाणे ठीक नव्हते. मला खात्री आहे की, आजपर्यंत ते प्रामाणिकपणे आज्ञापालन करीत होते; कारण त्यांचा ब्रिगेडिअर स्वत: त्यांच्याबरोबर होता. मी त्यांना सोडून जाणे याचा अर्थ फक्त त्यांचा कमांडर बदलला एवढाच नव्हता, तर त्याहीपेक्षा कितीतरी सखोल होता.

शिवाय ता. २० ऑक्टोबरपर्यंत तरी चिन्यांबरोबर 'लढाई' अशी सुरू झाली नव्हतीच! सरकार सांगतच होते की, चिनी मोठ्या प्रमाणावर काही करणार नाहीत! जर का मी अगोदर राजीनामा दिला असता आणि नंतर माझ्या दुर्दैवाने पण देशाच्या सुदैवाने खरोखरच चिन्यांनी हल्ला केला नसता तर माझ्या आज-वरच्या लष्करी कारकीर्दीला कलंक लागला असता. लोक म्हणाले असते 'बघा! चिनी काहीच करणार नव्हते! पण ते काहीतरी करतील या भीतीनेच हा घाबरट ब्रिगेडिअर राजीनामा देऊन जीव घेऊन पळाला!' माझ्या मनोदेवतेने मला बजावले की, असल्या लांच्छनास्पद अवस्थेत लष्करी कारकीर्द संपवू नकोस. आता या परिस्थितीत राजीनामा देऊ नकोस!

असे धरून चालू, की, मला भ्याड किंवा भित्रीभागुबाई ह्या पदव्या (!) मिळतील, ह्या धोका पत्करूनदेखील, मी राजीनामा दिला असता, तरी स्वत:ची कातडी बचावण्यापलीकडे आणखी मी काय मिळविणार होतो? मला माहीत होते की, मी जरी राजीनामा दिला तरी तो पुढच्या काही दिवसांच्या आत स्वीकारला जाणे शक्यच नाही. माझा राजीनामा स्वीकारला जाऊन दुसरा ब्रिगेड कमांडर येईपर्यंत चिनी थांबणार होते थोडेच? शिवाय नवीन ब्रिगेडिअरला तिथल्या हवामानाची सवय करून घ्यायला काही काळ लागला असता. जवानांना भेट देणे, रणक्षेत्राची माहिती करून घेणे ही कामे 'नव्या' ब्रिगेडिअरला करावीच लागली असती. ज्या वेळी प्रत्येक तास महत्त्वाचा होता अशा वेळी माझा राजीनामा समर्थनीय ठरला नसता. आपल्या पराक्रमी पायदळ तुकड्यांचे नशीब इतके बेवारशी नव्हते! जिथे भारताचे जवान तिथेच त्यांचा ब्रिगेडिअर असं मी म्हणावं इतकी त्यांची योग्यता होती.

...आणि म्हणूनच कुठल्याही परिस्थितीत आपली ब्रिगेड सोडायची नाही असे मी ठरविले: जे त्यांचे नशीब तेच माझे नशीब. जिंकू किंवा मरू नव्हे! मरूच!

पण घरी अंथरुणावर मरण्यापेक्षा माझ्या ब्रिगेडबरोबर मरू. या जन्मी किंवा पुढच्या जन्मी पुन्हा कधीही माझ्यापुढे हाच प्रश्न आला तरी मी हाच निर्णय घेईन. माझी परमेश्वराजवळ एवढीच प्रार्थना आहे की, भविष्यात कधीही भारतीय सेनेतल्या कुठल्याही ब्रिगेडिअरवर असे 'शीत युद्ध' (!) खेळण्याचा प्रसंग येऊ नये !

दुसऱ्या महायुद्धात गाजलेल्या जर्मन सैन्यातल्या फील्ड मार्शल Von Manstein बद्दल ब्रिटिश लष्कराचा इतिहासकार कॅप्टन Lidell Hart म्हणतो की " फिल्ड मार्शल Von Manstein म्हणजे लष्करी ज्ञानाचं दैवत होतं. हिटलरनं त्याला सक्त हुकूम दिला होता की, 'कुठल्याही परिस्थितीत मागं यायचं नाही.' या मुद्यावर तो हिटलरशी अनेकदा भांडला. कारण राजकीय दडपणापुढे नमते घ्यायचे नसते हे प्रत्येक सैनिकाला ठाऊक असते. ते प्रत्येक सैनिकाच्या नशीबात असते. अशा वेळी हाडाचा सैनिक विचार करतो की राजीनामा देऊ का नको ? "

आपल्या Lost Victories या पुस्तकात फील्ड मार्शल Von Manstein याने त्याच्या मन:स्थितीचे उत्तम वर्णन केलेले आहे. तो म्हणतो " अॅडॉल्फ हिटलर आणि जर्मन हायकमांड यांचं मन मी वळवू शकलो नाही. अशा परिस्थितीत आघाडीवरच्या वरिष्ठ कमांडरने राजीनामा द्यावा काय ? निश्चितच नाही, कारण 'परिस्थिती प्रतिकूल आहे' हे लक्षात आल्यावरोबर सुखासीन राजकारणी अनेक पळवाटा काढू शकतात. पण सांगतील तिथे आणि तसंच लढत राहणं हे सैनिकाचं कर्तव्य आहे. (The soldier has to fight where and when he is ordered.) दुसरं म्हणजे वरिष्ठ कमांडरला आपल्या जबाबदारीची जाणीव सतत पाहिजे. अशा ऐन वेळी मी राजीनामा दिला असता, तर जीवन मरणाच्या सापळचात अडकलेल्या जर्मन शूर सैनिकांचा मी विश्वासघात केला असा अर्थ झाला असता. मग भले माझा राजीनामा कितीही समर्थनीय असो ! "

आता कळलं मी राजीनामा का दिला नाही ते ?

चिनो हे समजून असले पाहिजेत की आघाडीवरचे भारताचे सैन्य म्हणजे फक्त शेतातले बुजगावणे आहे. कशावरून ? चिनीच कशाला, वाचकांनादेखील दुसऱ्या दिवशी पहाटे आपला दणदणीत पराभव होणे अपरिहार्यच होते अशी खात्री पटेल या अपेक्षेने, ता. १९ ऑक्टोबरला रात्री आपली सैन्यरचना कशी होती, याची थोडक्यात कल्पना देतो.

पाहा कशी होती आपली सैन्यरचना. नामका-चू नदीच्या बाजूने पूल क्रमांक १ ते सांगले या १२ मैलांच्या परिसरात ७ वी पायदळ तुकडी विखुरली गेली होती. आपल्या ब्रिगेडच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जायला ५ दिवस लागत होते. चिन्यांचा ज्यामुळे फायदा होऊ शकला असता आणि तसा तो पुढे झालाच, अशा पोकळया आता दाखवतो. या जवानांसाठी अन्न खाली टाकले

जात होते ते सांगधर या ठिकाणी. जवानांना वैद्यकीय मदत तावडतोब मिळू शकेल अशी सोय केली गेली नव्हती. त्यांच्याजवळ कपड नाहीत की त्यांची इतर कुठलीही व्यवस्था केली गेलेली नाही. मला कल्पना आहे, की इथे थोडीशी पुनरावृत्ती होत आहे. पण माझा हे सगळे पुन्हा सांगण्याचा हेतू एवढाच की ही स्थिती १९ ऑक्टोबरला रात्री होती ! कसे लढणार होते आपले जवान ?

आता आपल्या शस्त्रास्त्रांची ताकद ( ? ) बघा : सबंध आघाडीवर एकूण ४२१ फैरी झाडू शकतील अशा फक्त २ पॅरा-फील्ड गन्स आणि फक्त चार ४·२ इंची तोफा. ह्या तोफा फक्त प्रत्येकी ४५० फैरी झाडू शकल्या असत्या. एवढ्या विस्तीर्ण प्रदेशात फक्त २ आर्टिलरी ऑब्झरव्हेशन पार्टीज. त्यांच्याजवळ राखीव दारूगोळा अजिबात नाही. राजपूत तुकडीजवळ फक्त ६० बॉम्बस् आणि १७ लाईट मशिनगन्स ( नशीब त्या तरी 'भरलेल्या' होत्या. ) प्रत्येक जवानाजवळ फक्त २ हँडग्रेनेडस. ता. १० ते १९ ऑक्टोबरपर्यंत जो काही जादा ( ! ) दारूगोळा आणला गेला होता तो सांगले या ठिकाणी हलविण्यात आला होता.

वेळप्रसग पडल्यास मागे येता यावे अशी डावपेचाची लष्करी व्यूहरचना नव्हतीच. कारण राजकीय नेते फुशारकी मारून सांगत होते की 'आता आम्ही तिथून माग येणार नाही !' त्यांचे ठीक होतं हो ! पण लष्करीदृष्ट्या आमचे काय ? आपण मागे गेलो नाही तर चिनी आपल्याला मागे घालवून देतील हे प्रत्येक लष्करी तज्ज्ञाला ठाऊक झाले होते.

आपल्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही निष्काळजीपणा दाखविला गेला होता. सांगधर—ज्या ठिकाणच्या सुरक्षिततेवर पुढची सबंध ब्रिगेड अवलंबून होती—त्या ठिकाणी आपली फक्त एक तकलादू कंपनी ठेवली गेली होती. लुंपू या ठिकाणाला तर


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, अजूनही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (वी. एन.) पो. कतरीसराय (गया)

रायफलचे दर्शनच झाले नव्हते. आपल्या नामका-चू आणि जिम-जांग-चू या प्रदेशाचा एकमेकांशी संपर्क उरला नव्हता.

१/९ गुरखाज या तुकडीतल्या दोन कंपन्या सोडल्या तर बाकीचे जवान सांगले या ठिकाणी जाण्याच्या तयारीत होते आणि सांगधर या ठिकाणी दुसऱ्या दिवशी त्यांना येऊन मिळण्यासाठी तिथे एक कंपनी त्यांची वाट पहात उभी होती!

राजपूत तुकडीतले जवान पूल क्रमांक ३ पासून लॉग-ब्रीजपर्यंत विखुरलेले होते.

९/पंजाब ही तुकडी पूल क्रमांक २ वर कबजा करून होती आणि याच तुकडीतली एक कपनी सुटी करून सांगले या ठिकाणी पूल क्रमांक ५ जवळ होती.

4 Grenadiers; त्यांच्यापैकी २ कंपन्या वगळता पूल क्रमांक १ जवळ होती. याच तुकडीतली एक कंपनी किझमानेच्या संरक्षणासाठी निम-चांग-चू प्रदेशात 'उधार' दिली गेली होती. ता. १९ ऑक्टोबरपर्यंत आपण आपसांतच तुकड्यांची उधार-उसनवारी करीत होतो. हाथुंगला आणि सखिम यांच्यामध्ये फक्त १ कंपनी होती. पाहिलंत, कशी होती 'व्यूहरचना!' खऱ्या अर्थाने कुठलीही जागा अशी नव्हती की, जिचे संरक्षण करण्यासाठी सबंध ब्रिगेड उभी आहे. हाथुंगला ते लुंपू आणि सांगधर ते लुंपू या दोन प्रदेशांतल्या तुकड्यांचा एकमेकींशी काही संबंधच उरला नाही. असं म्हटलंय की जो बऱ्याच गोष्टी एकदम खायला बसतो त्याला काहीच पचत नाही! या दोन तुकड्यांतील अंतरामुळे कमांडिंग ऑफिसर्स किंवा मी यांची हुकमत जवानांवर खऱ्या अर्थाने चालूच शकत नव्हती. तशातच ही एकूण अजब रचनाच चिन्यांच्या बरोबर समोर समांतर रेषेवर होती. चिन्यांनी जेव्हा हल्ला चढवला त्या वेळी त्यांचे काम फार सोपे झाले. प्रचंड चिनी सैन्य एकेकटचा आणि अलग अलग तुकड्यांवर तुटून पडले.

जनरल कौल यांच्या अवेळच्या आजारीपणामुळे तर आधीच चुकीच्या मार्गाने केल्या गेलेल्या या रचनेचे आणखी तुकडे तुकडे झाले.

आता चिन्यांची तयारी कशी होती तीही बघा. चिनी सैनिक त्यांचे कमांडर्स सांगतील त्या 'जागा' भराभर घेत होते. ऊब मिळावी म्हणून चिनी सैनिक रात्री शेकोटचा पेटवून आरामशीर शेकोटीभोवती बसून शेक घेत असत. कळलं तुम्हाला यात काही? नाही ना? चिन्यांच्या या आरामाला आणि ऊब घेण्यालासुद्धा लष्करी दृष्टचा फार मोठा अर्थ होता. चिनी सैनिक नुसते शेकोटी भोवती जमून ऊब घेता घेता आणि काही न बोलता भारतीय जवानांची मानखंडना करीत होते. ते सुचवीत होते की, 'भारतीय जवानांनो, तुम्ही तिकडे जीव मुठीत धरून कुडकुडता आहात आणि आम्ही इकडे आरामशीर शेकोटचा पेटवून बसलोय. का? कारण तुम्हांला आमची धास्ती वाटते पण आम्हांला मात्र तुमची बिलकूल वाटत नाही. उगाच का इतका आराम करतो आम्ही? अरे! आधी तुम्ही संख्येने आहात किती? आणि कुठे? तर आमच्या समोरच असलेल्या खड्डचात! तुम्हाला पाठी-

मागून नाही कुणाची मदत ! तुम्ही आमच्यावर हल्ला करणेच शक्य नाही. आम्ही चिनी सैनिक मात्र केव्हाही तुमचा धुव्वा उडवू शकतो; म्हणून तर आम्ही आरामात आहोत !

मला आता नक्की आठवतंय की नाही कुणास ठाऊक, पण माझ्या आठवणी-प्रमाणे १८०२ मध्ये Austerlitz च्या लढाईत फ्रेंच आणि रशियन सैन्य असेच समोरासमोर उभे ठाकले होते. उभय पक्षांचे लढवय्ये एकमेकांपासून फारच जवळ आल्यामुळे दोन्ही पक्षांत एकमेकांबद्दल दरारा आणि अविश्वास निर्माण झाला. दोन्ही बाजूंना असे वाटत होते, की समोरच्या पक्षाने इतक प्रचंड सैन्य आणलंय की प्रत्यक्षात लढाई अशी होणारच नाही, हा नुसता ताकदीचा देखावा आहे.

भारत सरकारने ७ व्या पायदळ तुकडीच्या मागे प्रचंड सैन्य नुसते उभे करून ठेवून देखावा निर्माण केला असता, तरी आपल्या जवानांनी आरामशीर बसून शेकोटचा पेटविल्या असत्या आणि चिनी कमांडरने चिनी सैनिकांना ताकीद दिली असती असती की, गाढवांनो ! शेकोटचा पेटवून आराम कसला करताहात ! तिकडे समोर भारताच्या किती शेकोटचा पेटलेल्या आहेत त्या पाहा ! त्यांच्या प्रत्येक शेकोटीतला एक एक निखारा उद्या किंवा कुठल्याही क्षणी चिनी सैन्यावर आग ओकायला लागेल. आहे हिंमत त्या आगीला तोंड देण्याची ?

पण दुर्दैव या देशाचे. तसे कुठले व्हायला ? उलट चिनी कमांडरचे काम सोपे करून दिले गेले. पूल क्रमांक ३ आणि ४ येथील राजपूत जवानांचा संपर्क तोडन सरळ मधल्या वाटेने लुंपूपर्यंत धडक मारायची एवढेच त्यांचे काम उरले होते. संपूर्ण ७ व्या पायदळ तुकडीचा विध्वंस करून टाकण्यासाठी चिनी कमांडरला प्रत्यक्षात फक्त १/३ पायदळ तुकडीशीच सामना द्यायचा होता. बाकीचे जवान इतके पुढे गेले होते की त्यांच्याभोवती चिनी सैनिकांनी फक्त कडे करायचे होते. ७ व्या पायपळ तुकडीचे ते जवान चिनी सहज ठार मारू शकत होते किंवा त्यांना युद्धकैदी म्हणून अटक करू शकत होते.

(क्रमशः)


**From Himalayan Blunder by Brig. J. P. Dalvi**
**Thacker & Co. © with the Original Publisher.**

चित्रे
अशी सुरेख धारा, ह्या



Agfa क्लिक III खरेदी कराल त्याच दिवशी

- फक्त रोखा नि करा क्लिक. लावायला नको. चूक होण्याची धास्ती नाही.
- '१२०'च्या रोलवर १२ मोठी (६×६ सें.मी.) छायाचित्रे.
- शोभिवंत आच्छादन, पोर्ट्रेट लेन्स व फ्लॅशगन पाहिजे असल्यास ज्यादा आकार.



आगफा यांच्या देखरेखीखाली दि न्यु इंडिया इन्डस्ट्रीज लि. बडोदे, यांनी तयार केला

प्रमुख विक्रेते:
आगफा-गेव्हार्ट इंडिया लिमिटेड
मुंबई नवी दिल्ली कलकत्ता मद्रास

# चित्रपट

मराठी चित्रपट का पहावेत हा आताशा मला पडलेला एक यक्षप्रश्न आहे. त्याचं कारण असं की हल्लीच्या मराठी चित्रपटांत पाहण्यासारखं काही असत का ? उत्तर चक्क नाही असंच द्यावं लागले. ज्या मराठी चित्रपटांनी तीस वर्षांपूर्वी उत्तम, उत्कृष्ट अशी ख्याती प्राप्त केली होती, त्यांच्याच नशिबी आता भिकार, कंटाळवाणे ही उपाधी लागण्याची पाळी यावी यापरते दुर्दैव ते कोणते ? ह्या मराठी चित्रपटांच्या दैन्यावस्थेमुळे आजचा तरुण व मध्यमवयीन मराठी प्रक्षक मराठी बोलपटांच्या नादी लागत नाही. वेळप्रसंगी निकृष्ट असले तरी हिंदी बोलपट चालतात त्याला. कारण त्यांतील निर्मितिमूल्ये, चटकदार संगीत व रोमँटिक दृश्ये यांनी सुखावून जातो तो.

पण तरीसुद्धा एखादे चांगले मराठी चित्र प्रदर्शित होते. काही महिन्यांपूर्वी 'आम्ही जातो अमुच्या गावा'सारखे एक करमणूकप्रधान चित्र येऊन गेले. तेव्हा मराठी भाषेचा हा भुकेला प्रेक्षक त्याला गर्दी करून सोडतो. मराठी प्रेक्षकांच्या वतीनं मी एकच निर्वाळा देऊ शकतो, आणि तो म्हणजे मराठी प्रेक्षक हा जिथ जिथ चांगलं आहे तिथ गेलाच म्हणून समजा.

म्हणून गेल्या आठवड्यात ज्या वेळी महाराष्ट्र सरकारने कर माफ केला ते 'तांबडी माती' हे चित्र पाहायला मी गेलो. ते चित्र पाहण्यात अनेक उद्देश होते. पहिला उद्देश हा की, हे चित्र चित्रतपस्वी भालजी पेंढारकर ह्यांचे होते. म्हणजे त्यात काहीतरी नक्कीच चांगलं असणार ! त्याची कथा विचारप्रवर्तक असणार, संवाद–तो तर भालजींचा हातखंडा प्रयोग; निर्मितिमूल्ये हिंदीसारखी भपकेबाज नसली तरी त्यांत भरपूर वास्तवता असणार, पात्रांचा अभिनय सहजसुंदर असणार ! हे सगळे भालजी पेंढारकर बोलपट म्हटला म्हणजे यायला हवे. दुसरा उद्देश म्हणजे ह्या चित्रपटाच्या सुरुवातीपासून जेव्हा वर्तमानपत्रांत त्याच्या बातम्या येत तेव्हा एका सत्यघटनेवर आधारलेलं, पहिलवानाच्या जीवनावरलं चित्र अशी माहिती येत असे. त्याच्याकरिता भालजींनी नायकाच्या भूमिकेसाठी खुद्द एका कुस्तीगीरालाच घेतलं आहे अशा बातम्या ! तेव्हा ह्या चित्रपटाबद्दलचं कुतूहल आणखीनच वाढल. म्हटलं मराठीमध्ये तमासगीर आणि कौटुंबिक चित्रांपेक्षा या मर्दानी नि मैदानी

नायिकाप्रधान चित्र

# तांबडी माती

भाई भगत

चित्रात काहीतरी वेगळे पाहायला मिळणार आणि तिसरा नि शेवटचा उद्देश म्हणजे सरकारने करमुक्त केलेला चित्रपट. म्हणजे ह्यात काहीतरी विशेष असणार.

पण मी जेव्हा हा चित्रपट पाहिला तेव्हा काय झालं? सुरुवात तर झक्क झाली. भालजींच्या प्रत्येक चित्रपटाची असते तशी. चित्रपटाची श्रेयमालिका दर्शविताना 'बहु असोत सुंदर' हे काव्य पार्श्वसंगीतासाठी वापरण्यात आलं. चित्राची भव्यता वाढविण्यासाठी व मराठी मन आकर्षित करून घेण्यासाठी हे केव्हाही चांगलच परन्तु त्यानंतर जेव्हा चित्रपटाची सुरुवात झाली ती अशी—खेडेगावातला नदीकाठ. नायिकेच दर्शन. त्यानंतर समाजकंटकाचं दर्शन वगैरे वगैरे.

वास्तविक हे पहिलवानाच्या जीवनावरचं चित्र. म्हणजे नायकप्रधान चित्र. मग त्याच्याशी निगडित अशी सुरुवात करायला हवी होती. पण ह्या चित्रात सुरुवातीपासून जे दिसायला लागत ते तानी नावाच्या एका बालविधवेच चित्र. तिच्यावर आलेली अनेक संकटं, त्यांतून तिन काढलेला मार्ग. हे सगळ पाहून अस वाटायला लागत की, ह्या चित्रपटाला जे 'तांबडी माती' हे नाव दिले आहे ते कशासाठी? त्यापेक्षा 'तानी' हे नाव जास्त शोभून दिसल असत. अशा ह्या तानीचा छळवाद ह्या चित्रपटातला तथाकथित खलनायक का करतो त्याच कारण शेवटपर्यंत कळत नाही. हा खलनायक म्हणजे तरी कोण? तर एक फाटका माणूस. तो पाटलाचा आश्रित आहे. आणि पाटलाच्या जिवावर तो सारी कृत्ये करतो. वास्तविक सुरुवातीच्या दृश्यांमध्ये पाटलाला हा खलनायक आवडत नसल्याचे कळते. तर मग हा पाटील खलनायकाच्या उपद्व्यापांशी मागाहून सहमत कसा काय असतो? तस एक क्षुल्लक कारण आहे आणि ते म्हणजे पाटलाच्या मुलीच नायकावर सुप्त प्रेम असत. तेव्हा तिचे लग्न नायकाशी लावून देण्याचा पाटलाचा विचार असतो आणि नायकाचे लग्न तर तानीबरोबर ठरते. आणि मग हा हलक्या कानाचा पाटील खलनायकाच्या मागं राहून दुष्कृत्ये करू लागतो. ह्या नायिकेला पाठराखण असते नायकाची आई. परंतु लग्न झाल्यानंतर काही दिवसांनी तीदेखील कुठतरी गायब होते. नायकाला तर मंद गतीन चालण्याखेरीज नि कधीमधी तोंड उघडण्याखेरीज (ते उघडल नसत तरी चालल असत. प्रेक्षक हसतात त्या वेळी)

काहीच काम नाही. ते बहुतेक काम त्याचा मित्र करतो. शिवाय त्याच्यावर मूक प्रेम करणारी आणखीन् एक उपनायिका रंगू नायकीण आहे. ही नायकीण उत्तरार्धात खलनायिका ठरते.

## कंटाळवाणी लांबड

शेवटी तानीवरील संकटांची पायमल्ली होऊन ती पाटलाला वचन दिल्याप्रमाणे नवऱ्याच घर सोडून निघते. आणि याचवेळी कुस्ती जिंकलेला नायक घरी यायला निघतो–नव्हे घरी येतो आणि पिचक्या आवाजांत हाक देतो–'लक्ष्मी.' आणि मग देशोधडीला लागलेल्या नायिकेच्या पायांच्या क्लोजअपवर 'लक्ष्मी लक्ष्मी' हे शब्द घुमत राहतात. मला वाटत इथच जरी हे चित्र सोडून दिल असत तरी एक चांगला परिणाम साधून गेला असता. पण पुढ नायिका बाळंत होते, तिची व सगळ्यांची भेट होते. ज्या पाटलांना दिलेल्या वचनानुसार ती घर सोडते तेदेखील तिची क्षमा मागायला येतात. इथपर्यंत ही लांबण वाढते. आणि प्रेक्षक? तो तर बिचारा झालेल्या नि पाहिलेल्या सगळ्या प्रसंगांनी अर्धमेला झालेला असतो. कसाबसा उठतो नि म्हणतो 'तरी थोडक्यांत सुटलो टॅक्सफ्री चित्र होते म्हणून!'

मला वाटल होत की पूर्वी पहिलवानाच्या जीवनावर 'मानाचं पान' म्हणून एक चांगल चित्र आल होत. त्याहून हा भालजी पेंढारकर बोलपट चांगला असेल. त्यात एखाद्या कुस्तीगीराचं जीवन दाखवल असेल. परन्तु तसले काही नाही. तशा न्यूजरीलमध्ये दाखवतात तशा एकदोन कुस्त्या व तालमीतली दृश्य आहेत एवढंच. हे झाल ठोकळमानान कथेविषयी. आता अभिनय. शक्तीकुमार नावाचा कुणी पहिलवान या चित्राचा नायक आहे. एक वेगळा चेहरा व चांगली शरीरयष्टी या- खेरीज हा प्राणी नायक म्हणून का वावरला तेच कळत नाही. तसच दादा कोंडके ह्या रंगभूमीवरल्या लोकनाट्याच्या शाहिराला कॅमेऱ्याच्या चौकटीत सहज सुलभ- तेने वावरता आलेले नाही. लक्षात भरते ती व्यक्तिरेखा खलनायकाची. ती भूमिका मधू भोसले ह्या गुणी नटाने समजून उमजून केली आहे. निदान त्याच्या कामामुळे तरी सुसह्य वाटते. ह्या नटाला भविष्यकाळात चांगल्या भूमिका जरूर मिळाव्यात. अनुपमा काम समजून करते पण तिच्यात भूमिकेच बेअरिंग नीट राहत नाही, तिचा बालीशपणा वारंवार उफाळून येतो. कधीकधी तर मेळ्यांतल्या मुलीसारख तिच काम वाटायला लागत. आशा काळेमध्ये अजूनही नाटकीपणा वाटतो.

संगीताबद्दल ह्या चित्रपटाने चांगलीच निराशा केली. एकही गाणे लक्षात राहत नाही. फ्रेंच चित्रपटांनी किंवा तत्सम चित्रपटांनी उचललेली विनापार्श्वसंगीताची प्रथा इथही वापरलेली दिसते. तेवढाच भाग उल्लेखनीय. दादा कोंडकेच्या बैल- गाडीमधील गाण्यचाया वेळी दादा कोंडकेची लिप् मुव्हमेंट अयोग्य वाटते. एडिटर कृपया नोंद घेणे!

छायाचित्रणाबाबत काय बोलावे ? कमीअधिक प्रमाणात ते चांगले आहे इतकेच. मी जो प्रिंट पाहिला त्यात इंटरव्हलनंतर निगेटिव्ह स्क्रॅचेच होते. रशप्रिंटस्च्या वेळी कॅमेरामन किंवा लॅबोरेटरी इनचार्ज यांचे दुर्लक्ष झालेलं दिसतं. आऊटडोअर-मध्ये काही ठिकाणी अनुपमा व शक्तीनुसार ह्याचे लायटिंग फ्लॅट लायटिंग वाटते. चित्रात असा एकही शॉट चांगला नाही की, त्याचे कॉम्पोझिशन चांगले आहे.

भालजींच्या संवादात नेहमीसारखी मजा नाही. तरीपण टाळीची काही वाक्ये आहेतच. अनुपमाच्या तोंडचे कुंकवासंबंधी ' जिथं देवानच कुंकू पुसलं तिथं माणसानं मोठं करून काय उपयोग ' असलं सुंदर वाक्यही भालजी मधूनच लिहून जातात.

पण खेदाची गोष्ट हीच वाटते की सत्यजित रे, तपन सिन्हा ह्या बंगाली दिग्दर्शकांच्या पठडीत जाऊन ' प्रायोगिक प्रायोगिक ' म्हणून चित्रपट काढण्याचा भालजींनी अट्टाहास का करावा ? भालजींच्यात स्वतंत्र प्रज्ञा आहे. त्यांचे स्वतःचे असे ' भालजी स्कूल ' आहे. मीठभाकर, सूनबाई, साधी माणसं या सारखे सुरेख सामाजिक व शिवकालीन अनेक चित्रपट ज्या भालजींनी दिले त्यांच्याकडून तसल्याच सर्वांगसुंदर चित्रपटाची अपेक्षा होती.

□ □ □


## पुरंदऱ्यांची नौबत

बुलंद बुरूज / हूल / कोजागिरीची रात्र / पंत
फोंडा ! फोंडा ! / नावजी बलकवडे
पिऱ्या बेरड / इमान

**आठ शिवकालीन कथा**

ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन

# दादूमियांची काही चूक माहिती

[ पृष्ठ १४ वरून ]

राष्ट्रीय स्वातंत्र्य व भारतनिष्ठा या मुद्यांवर गोविंदभाईंचा त्या वेळी कम्युनिस्ट पक्षाशी प्रमुख मतभेद होता. दुसरे दोन गौण मतभेद म्हणजे रशियात हुकूमशाही आहे हे योग्य नाही असे गोविंदभाईंना वाटे. आंतरराष्ट्रीय राजकारणात त्यांना रशियाविषयी सहानुभूती वाटत असली तरी रशियाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी भारतीयांनी झटावे हे गोविंदभाईंना मान्य नव्हते. कम्युनिस्टांचा गांधी–नेहरूंवर विश्वास नव्हता, गोविंदभाई खादीधारी होते आणि गांधी–नेहरूंना राष्ट्रीय नेते मानणारे होते. (पूज्य स्वामीजी हे कानडी आणि गोविंदभाई हे गुजराथी – हे मराठवाड्याचे दोन प्रमुख नेते. स्वामीजींचे कानडीपण जसे विसरले गेले, तसे गोविंदभाईंचे गुजराथीपणही विसरले गेले आहे. इतके दोघेजण मराठवाड्याशी समरस झाले.)

कम्युनिस्टांशी असणारा गोविंदभाईंचा वैचारिक मतभेद १९४२ पूर्वी वैचारिक चर्चेचा भाग होता. १९४२ साली कम्युनिस्ट लोक युद्धाच्या घोषणा देत होते. १९४२ च्या चळवळीत गोविंदभाईंनी आपल्या सर्व शक्तीने भाग घेतलेला आहे. कॉंग्रेसमधून कम्युनिस्टांना हाकलून काढावे हे गोविंदभाईंना मान्य नव्हते. या मुद्यावर त्यांनी नेहरूंशी भांडण केले, पण जेव्हा राष्ट्रीय निर्णय ठरला तेंव्हा गोविंदभाईंनी कॉंग्रेसमध्ये राहणे पत्करले व निष्ठुरपणे कांग्रेस संघटनेतून कम्युनिस्टांना बाहेर काढले. १९४७ च्या मुक्ति-आंदोलनात कम्युनिस्टांची भूमिका भारतीय स्वातंत्र्य अमान्य करणारी, नेहरूंना साम्राज्यवाद्यांचे हस्तक मानणारी आणि भारतीय संघराज्य धोक्यात आणून हैदराबादच्या स्वातंत्र्याला पाठिंबा देणारी अशी होती. गोविंदभाई भारतीय स्वातंत्र्य ही कैक शतकांनंतरची इच्छापूर्ती मानीत, भारतीय लोकशाही बळकट करणे आपले कर्तव्य मानीत, हैदराबाद भारतात विलीन करण्यासाठी त्यांनी सर्वस्व पणाला लावले व लढा दिला. नेहरूंना ते भारतीय स्वातंत्र्याचे महान् नेते मानीत.

कम्युनिस्टांचे नेहरू-प्रेम १९५४ नंतर उचंबळून आले आणि चिनी आक्रमणाच्या वेळी पुन्हा कम्युनिस्ट भूमिका बोटचेपीच राहिली. गोविंदभाईंचे नेहरू-प्रेम १९३८ सालपासूनचे आहे, ते अजूनही तसेच आहे. आणि त्यांचे राष्ट्र-प्रेम इतके प्रखर आहे की, त्यांना चेष्टा-विनोदातसुद्धा गांधी-नेहरू, पटेल, आझाद गफ्फारखान यांच्याविषयी कमीजास्त बोललेले सहन होत नाही.

पोलीस ॲक्शननंतर गोविंदभाई कॉंग्रेसबाहेर पडले. त्यांनी एक समाजवादी संघटना उभी केली. या संघटनेतही मी एक छोटा अनुयायी होतो. तिथेही लोकशाही निष्ठा आणि राष्ट्र-प्रेम या मुद्यांवरच गोविंदभाई व कम्युनिस्ट यांचे मतभेद आहेत. १९५२ सालानंतर जवळजवळ गोविंदभाई पक्षीय राजकारणातून निवृत्तच

आहेत. गेली १४-१५ वर्षे खाजगी महाविद्यालये, मराठवाडा विद्यापीठ आणि खादी कार्य यांत गोविंदभाई गढलेले आहेत. ते कम्युनिस्ट पद्धतीच्या कामात गुंतलेले नाहीत. गोविंदभाई यांच्याशी आमचेही मतभेद होतात. त्यांच्याकडून कठोर वाक्ताडन आम्हालाही मिळते. पण वीस वर्षे हा माणस जवळन पाहिल्यानंतर हा कम्युनिस्ट नव्हे हे सांगितले पाहिजे.

मी स्वत: कम्युनिस्ट नाही, पण कम्युनिस्टांना मी अस्पृश्य समजत नाही. गोविंदभाई कम्युनिस्ट असते तर त्यांना मी पापी मानले नसते. पण ते कम्युनिस्ट नाहीत. त्यांचे निकटवर्ती सहकारी कुठे गेले हेही पाहिले पाहिजे. या निकटवर्ती सहकाऱ्यांत 'मराठवाड्याचे' संपादक अनंत भालेराव कम्युनिस्टविरोधक आहेत. आ. कृ. वाघमारे कम्युनिस्टविरोधकच होते. ते तर मार्क्सवादीही नव्हते. पू. बाबासाहेब परांजपे, गंगाप्रसाद अग्रवाल, बोरीकर ही मंडळी शिक्षणकार्य, खादी, किंवा सर्वोदयात आहेत. वैशंपायन कॉंग्रेसमध्य आहेत. मराठवाड्यातील गोविंदभाईंच्या गटापैकी एकही मोठा माणूस कम्युनिस्ट पक्षाला मिळालेला नाही. बहुसंख्याक लोक कम्युनिस्टांचे विरोधक आहेत.

तरीही गोविंदभाई अनेकांना कम्युनिस्ट वाटतात. त्यातील सत्य ते मार्क्सवादी आहेत इतकेच आहे. आणि आपला मार्क्सवाद त्यांनी कधी लपविलेला नाही.

ही माहिती देताना थोडे विषयांतर करून दोन वंदनीय नेत्यांचे स्मरण केले पाहिजे. ब्रिटिश भारतात हिंदूही गुलाम होते, मुसलमानही गुलाम होते. म्हणून इंग्रज गुलामीविरुद्ध झगडणे मुसलमानांना शक्य होते; कारण इंग्रज गेल्यानंतर आपण भारतावर वर्चस्व प्रस्थापित करू शकू, अशी या राष्ट्रवादी मुसलामानांना आशा होती. असा विचार करणारेसुद्धा फार नव्हते हा प्रश्न निराळा. हैदराबाद संस्थानात चित्र निराळे होते. इथे प्रत्यक्ष मुसलमानांच्या वर्चस्वाविरुद्धच लढा चालू होता. या लढ्यात ज्या मुस्लिम नेत्यांनी भाग घेतला ते खरे राष्ट्रभक्त आणि लोकशाहीवादी होते. ब्रिटिश इंडियातील तथाकथित राष्ट्रवादी मुसलमानांप्रमाणे दांभिक नव्हते. अशा या आमच्या आदरणीय नेत्यांत कै. सिराजुल हसन तिरमिजी हे ज्येष्ठ नेते होते. अनंत यातनात त्यांनी प्रखर ध्येयवाद टिकवून धरला. दुसरे पैगंबरवासी हुतात्मा शोयेबुल्लाखाँ. हे तर राजधानीत रझाकारांकडन मारलेच गेले. हेही आंदोलनाचे भागीदार होते, कम्युनिस्ट नव्हते.

दादूमियांनी जी माहिती दिली आहे तीत अजूनही वादग्रस्त विधाने भरपूर आहेत. पण त्याविषयी मी काही लिहीत नाही. मोगलांचे शेवटचे अवशेष समाप्त करून भारत एकसंध करणारा लढा ज्यांनी दिला ते हैदराबाद मुक्ति आंदोलनाचे नेते सगळे येथून-तेथून कम्युनिस्ट होते या असत्य माहितीमुळे एकदम मी व्यथित झालो. म्हणन हे लिहिले, नाही तर हेही लिहिले नसते.

□ □ □

चौथी सचित्र आवृत्ती

□ □

# राजा शिवछत्रपति

□ □

ब. मो. पुरंदरे

□ □

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

□ □

राजहंस प्रकाशन

पुणे

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H-649



" काही नाही ! मीटींगमध्ये मी कसा वागलो याबद्दल कोणाच्या मनात मागाहून काही संशय रहायला नको म्हणून हा मुखवटा ..."